कृषीवल
रायगड, गुरुवार, दि. ४ जुलै २०२४
किंमत ४ ₹

## हेमंत सोरेन पुन्हा मुख्यमंत्री होणार

**झारखंड :** हेमंत सोरेन पुन्हा एकदा झारखंडचे मुख्यमंत्री होणार आहेत. ईडीने अटक केल्यानंतर त्यांना आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. बरेच महिने तुरुंगात राहिल्यानंतर त्यांना जामीन मिळाला. आता तुरुंगातून बाहेर आल्यानंतर ते पुन्हा एकदा मुख्यमंत्री होणार आहेत. झारखंड मुक्ती मोर्चा, काँग्रेस आणि आरजेडीच्या विधिमंडळ पक्षांच्या बैठकीत हेमंत सोरेन यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनवण्यासाठी चर्चा झाली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ते लवकरच मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. कथित जमीन घोटाळ्यात हेमंत सोरेन यांना अटक झाली होती. मुख्यमंत्री चंपाई सोरेन लवकरच राज्यपालांकडे आपला राजीनामा सोपवणार आहेत. चंपाई सोरेने यांना पान २ वर

## आरटीई प्रवेशाला दिरंगाई

**रायगड :** राज्य सरकारचे आरटीईबाबतचे नवे धोरण कमकुवत आर्थिक परिस्थिती असलेल्या नागरिकांना मारक ठरत आहे. यंदा शाळा सुरू होऊन पंधरवडा उलटला, तरीही आरटीईचे काही ठरेना. न्याय प्रविष्ट प्रकरणामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानीची भीती पालकांना वाटत आहे.आर्थिक दुर्बल घटकातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी आरटीई प्रवेशांतर्गत नोंदणी केलेल्या शाळांमध्ये २५ टक्के कोटा राखीव ठेवण्यात येतो. त्यामुळे पालक आरटीईतून पाल्याचा प्रवेश व्हावा, या प्रतीक्षेमध्ये असतात. दरवर्षी आरटीईची प्रवेशप्रक्रिया आतापर्यंत अर्धी झालेली असते. यंदा जुलै महिना उजाडला तरी पालकांना पान २ वर

## तिसऱ्या मुंबईसाठी आ. जयंत पाटील यांची मागणी

# स्थानिकांना विश्वासात घ्या

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**तिसऱ्या मुंबईच्या प्रकल्पामुळे शेतकरी भूमीहीन होण्याची भिती आहे. उरण, पेण, पनवेल येथील हजारो शेतकऱ्यांनी अधिसुचनेला हरकती नोंदवून प्रकल्पाला विरोध दर्शविला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन तिसऱ्या मुंबईची निर्मिती करा, अशी मागणी आ. जयंत पाटील यांनी करीत अधिसूचनेला स्थगिती देण्याबाबत काय कार्यवाही केली असा संतप्त सवाल उपस्थित केला. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगर रचना विभागाकडून अभियान विचारात घेऊन फेरबदल प्रस्तावावर अधिनियमानुसार निर्णय घेण्याचे नियोजित असल्याचे सांगितले.**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील २९, पनवेलमधील ७, पेणमधील ८८, मुंबई महानगर प्रादेशिक योजना क्षेत्रातील दोन आणि रायगड प्रादेशिक योजना क्षेत्रातील नऊ गावांचा तिसरी मुंबई प्रकल्पासाठी समावेश करण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी १२४ महसूली गावातील अंदाजे ३२३.४४ चौरस किलो मीटर क्षेत्रात परिसर पसरला आहे. तिसऱ्या नवी मुंबई निर्मितीची जबाबदारी सिडकोकडून काढून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण(एमएमआरडीए) यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

या प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यासाठी शासनाने ४ मार्च २०२४ रोजी अधिसुचना प्रसिध्द केली. या अधिसुचनेला हरकती नोंदविण्यासाठी ६ एप्रिल २०२४ रोजी शेतकऱ्यांना मुदत देण्यात आली होती. २५ हजारहून अधिक शेतकऱ्यांनी या हरकतीच्या माध्यमातून प्रकल्पाला विरोध केला आहे. या प्रकल्पामुळे पान २ वर



## अलिबागची पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करा

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, रोहा या शहरांमध्ये पाणी पुरवठा योजना राबविल्या जातात. मात्र अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण असताना नगरपरिषद हद्दीत अद्यापर्यंत पाणी पुरवठा योजना राबविली नसल्याची बाब आ. जयंत पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. अलिबाग हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे शहर म्हणून ओळखले जाते. जिल्ह्याचे ठिकाण म्हणून अलिबागची एक वेगळी ओळख आहे. वर्षाला सुमारे तीन लाखाहून अधिक पर्यटक अलिबागमध्ये येतात. अलिबाग शहरामध्ये जिल्हा, तालुका, स्तरावरील शासकीय कार्यालये, निवासस्थाने आहेत. वाढत्या नागरीकरणामुळे शहराची लोकसंख्या वाढली आहे. शहराला आजही टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. त्यामुळे मे महिन्यात शहरातील नागरिकांना पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होतो. ही बाब आ. जयंत पाटील यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिली. त्यामुळे शहरातील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा मिळावा, यासाठी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात यावी, अशी मागणी पाटील यांनी केली. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहराला कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याचे कबूल केले. वाढत्या नागरीकरणाचा विचार करीत नगरोत्थान पान २ वर

## मराठा आरक्षण देताना ओबीसींवर अन्याय करू नका

**■ शेकापचे आ.जयंत पाटील यांची मागणी**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मराठा आरक्षण देताना ओबीसींवर अन्याय करू नका आणि हे आरक्षण सरकार कुठून देणार हे अगोदर स्पष्ट करा, अशी मागणी शेकापचे आ. जयंत पाटील यांनी बुधवारी (दि.३) विधान परिषदेत केली. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावतीने उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी उत्तरात सांगितले की, संविधानाच्या शेड्ल्ड ९ नुसार मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी न्यायालयात सरकारची बाजू वकील भक्कमपणे मांडत आहेत. ओबीसी समाजाच्या आरक्षणला धक्का न लावता हे आरक्षण दिले जाईल, असे यावेळी शंभूराज देसाई यांनी सभागृहात स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार विक्रम काळे म्हणाले की, राज्य विधीमंडळाच्या सत्रात मराठा समाजालाआरक्षणमिळण्याबाबतचा कायदा संमत करण्यात आला. तरी मराठा समाजाच्या नागरिकांना जातीचा दाखला न मिळाल्यामुळे खुल्या वर्गातून नोकरीसाठी अर्ज भरावा लागतो. नॉन क्रीमिलियर प्रमाणपत्रही वेळेवर मिळत नाही.

याबाबत मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, ११ मार्च २०२४ चे शासनपरिपत्रकआणिदिनांक१५मार्च २०२४ च्या शासन शुद्धीपत्रकानुसार जात प्रमाणपत्र व नॉन क्रीमीलियर प्रमाणपत्र वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हा पातळीवर संबंधित यंत्रणेला प्रमाणपत्रे देण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. महापोलीस भरती जाहिरातीमध्ये अर्ज करण्यासाठी सरकारने १५ एप्रिल २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. एसईबीसी आरक्षण अधिनियम २०२४ विरोधात दाखल झालेल्या याचिकेमध्ये शासनाच्या वतीने उच्च न्यायालयात भक्कमपणे बाजू मांडण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**आजचा अग्रलेख**
**क्षुद्रबुध्दी पंतप्रधान**

**वे|ध|क**

## ५० देशांना द्राक्ष निर्यात

**पुणे :** यंदाच्या द्राक्ष हंगामात राज्यातून उच्चांकी द्राक्ष निर्यात झाली आहे. अमेरिका, ब्रिटन, युरोपीय देशांसह जगभरातील ५० देशांना राज्यातून ३ लाख २४ हजार ४४१ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. यंदा देशातून अमेरिका, ब्रिटन, युरोपीय देशांसह जगभरातील एकूण पन्नास देशांना ३४.६१ कोटी रुपये किमतीची सुमारे ३ लाख ४३ हजार ९८२ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. एकूण निर्यातीत राज्याचा वाटा ९६ टक्के असून, राज्यातून ३३.९५ कोटी रुपये किमतीच्या ३ लाख २४ हजार ४४१ टन द्राक्षांची निर्यात सुरू झाली आहे.

## गॅस्ट्रो,हिवतापाने मुंबईकर हैराण

**मुंबई :** पावसाळा सुरू झाला की साथीच्या आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ होते. जूनमध्ये पावसाला सुरुवात झाल्याने मुंबईमध्ये विविध साथीच्या आजारांचे तब्बल १,३९५ रुग्ण आढळून आले आहेत. यामध्ये गस्ट्रो आणि हिवतापाच्या रुग्णांची संख्या अधिक आहे.मुंबई महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार मुंबईत जूनमध्ये विविध साथीच्या आजाराच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. जूनमध्ये साथीच्या आजारांचे १,३९५ रुग्ण सापडले आहेत. यामध्ये गॅस्ट्रोचे सर्वाधिक ७२२ रुग्ण सापडले. त्याखालोखाल हिवतापाचे ४४३, कावीळ ९९, डेंग्यू ९३, लेप्टो २८ आणि स्वाईन फ्लूचे १० रुग्ण सापडले आहेत.

# ३२८ कोटींच्या ड्रग्सचं रॅकेट सापडलं

## थेट अंडरवर्ल्ड कनेक्शन, १५ आरोपींना अटक

**। विरार । प्रतिनिधी ।**

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या क्राईम युनिट १ ने अंडरवर्ल्डशी संबंध असलेल्या मोठ्या ड्रग्स रॅकेटचा भांडाफोड करण्यात यश मिळवलं आहे. याप्रकरणी महाराष्ट्रातून ३, तेलंगणातून ३, उत्तर प्रदेशातून ८ आणि गुजरातहून १ असे १५ आरोपींना अटक करण्यात आले आहे. त्यांच्याकडून ३२८ कोटीच एम.डी. (मेफेड्रॉन) अंमली पदार्थ, कच्चे एम.डी. आणि एम.डी. बनवण्यासाठी लागणारे केमिकल्स, साहित्यासोबतच ३ पिस्टल, १ रिवॉल्वर आणि ३३ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत, अशी माहिती एम.बी.व्ही.व्ही. पोलीस आयुक्तालयात पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी दिली.

१५ मे २०२४ रोजी क्राईम युनिट १ ला गुप्त पान २ वर



### ३ पिस्टल, १ रिवॉल्वर आणि ३३ जिवंत काडतुसे जप्त

तपासात क्राईम युनिटला अंमली पदार्थाचं कनेक्शन उत्तर प्रदेशात असल्याचं निष्पन्न झालं. उत्तर प्रदेशाच्या आजमगड येथून आरोपी सलीम डोळा आणि दया याचे साथीदार आरोपी अमिर तौफीक खान, त्याचा भाऊ बाबू तौफीक खान याचे साथीदार मोहम्मद नदीम शफिक खान, एहमद शाह फैसल शफीक आझमी यांना अटक करून त्यांच्याकडून ३०० कोटी किंमतीचे १२ कच्चे एम.डीचे ड्रम जप्त केले. याच गुन्ह्यातील अमिर तोफीक खान, मोहम्मद शादाब मोहम्मद शमशाद खान आणि अलोक विरेंद्र सिंह यांना उत्तर प्रदेशातील लखनऊ येथून अटक केली. यातील आरोपी अमिर खान याने दिलेल्या माहितीनुसार उत्तर प्रदेश येथे राहणार अभिषेक उर्फ शुभम नरेंद्रप्रताप सिंह याला १ जुलै रोजी नालासोपारा येथून अटक केली. त्याच्याकडून पोलिसांना ३ पिस्टल, १ रिवॉल्वर आणि ३३ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात यश आलं. ३२७ कोटी ६९ लाख ४३ हजार ६० रुपये किंमतीचे एम.डी. अंमली पदार्थ, कच्चे एम.डी., एम.डी. बनविण्यासाठी लागणारे केमिकल्स, साहित्य, आणि ३ पिस्टल, १ रिवॉल्वर आणि ३३ जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.

# उमटे धरणाच्या संरक्षक भिंतीचे काम सुरु

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

उमटे धरणाच्या भिंतीला भगदाड पडल्याची बातमी दैनिक कृषीलने दिली होती. उमटे धरण संघर्ष ग्रुपने याबाबतची तक्रारही जिल्हा प्रशासनाकडे केली होती. यासर्व प्रकरणाची दखल अलिबाग तहसिलदार यांनी घेऊन धरणाची दुरुस्ती तातडीने करणे गरजेचे असल्याचा अहवाल दिला होता. त्यानुसार आता धरणाच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आले आहे. धरणाच्या ठिकाणी चिखल झाल्याने बांधकाम साहित्य नेताना संबंधितांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. पान २ वर




> उमटे धरणाच्या भिंतीला पडलेल्या भगदाडीच्या कामाला जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सुरुवात झाली आहे. धरणाच्या बांधावर असलेली मोठी झाडी तोडून एक प्रकारे उमटे धरण कित्येक वर्षानी मोकळा श्वास घेत आहे. त्याबद्दल असून जिल्हा परिषदेचे आभार. – ॲड. राकेश पाटील,
> उमटे धरण संघर्ष ग्रुप रायगड

## गॅसचा टेम्पो दरीत कोसळला

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

**चालक जखमी; वायू गळतीच्या धोक्यामुळे सतर्कता**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटात उरण ते लोटे नायट्रोजन गॅस वाहतूक करणारा आयशर टेम्पो खचलेल्या रस्त्यावरून चढत असताना गती न घेतल्याने पाठीमागे येऊन खोल दरीत कोसळला. या अपघातात चालक गंभीर झाला असून वायू गळतीमुळे वाहतूक पोलीस सतर्कतेने प्रसंग हाताळत असल्याचे दिसून आले.

कशेडी घाटातून चालक अफिझुर रेहमान हा आयशर टेम्पोमध्ये नायट्रोजन गॅस भरून उरण ते लोटे येथे घेऊन जात होता. भोगाव गावच्या हद्दीत खचलेल्या रस्त्यावर चढताना टेम्पोने गती न घेतल्याने टेम्पो मागे येऊन थेट संरक्षक कठडे तोडून पान २ वर



## प्रेयसीची आत्महत्या; प्रियकराला अटक

**। पनवेल। वार्ताहर।**

नाशिक येथे राहणाऱ्या तरुणाने, पनवेल येथील २७ वर्षीय तरुणीसोबत ९ वर्षे प्रेमसंबंध आणि वेळोवेळी तिच्यासोबत शारीरिक संबध ठेवत अचानकपणे तिच्याशी लग्न करण्यास नकार दिल्याने मानसिक तणावाखाली आलेल्या तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर पनवेल शहर पोलिसांनी आरोपी विजय प्रकाश गोरे (२८) याच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील मृत तरुणी पनवेल येथे तर आरोपी प्रियकर विजय गोरे नाशिक, ओझर येथे राहण्यास आहे. २०१६ मध्ये या दोघांमध्ये प्रेमसंबंध सुरु झाले होते. यादरम्यान विजय गोरे याने तरुणीसोबत अनेकवेळा शरीरसंबंध प्रस्थापित केले होते. त्यानंतर २०२० मध्ये दोघेही लग्न करणार असल्याचे तरुणीने आपल्या आई-वडिलांना सांगितले होते. या दोघांच्या लग्नास तरुणीच्या आई-वडिलांनीही होकार दिला होता. गेल्या ९ वर्षापासून या दोघांमध्ये प्रेमसंबंध सुरु होते. त्यानंतर मे महिन्यामध्ये विजयने त्याच्या आई-वडिलांचा त्यांच्या लग्नास विरोध असल्याचे तसेच त्यांनी दुसऱ्या मुलीसोबत त्याचे लग्न करण्याची तयारी सुरु केल्याचे प्रेयसीला सांगून लग्नास नकार दिला होता. त्यानंतर सदर तरुणीने आपल्या बहिणींसह नाशिक येथे जाऊन विजय गोरे याची भेट घेऊन त्याला लग्न न करण्यामागचे कारण विचारले होते. त्यावेळी विजय गोरे याने वेगवेगळी कारणे सांगून तिच्यासोबत लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला होता. या तरुणीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात त्याच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी विजय गोरे याला चौकशीसाठी बोलावून घेतले होते. मात्र, तो पोलीस ठाण्यात सुध्दा हजर झाला नाही. त्यानंतर खचलेल्या या तरुणीने कामावर जाणे सुध्दा बंद केल्याने ती मानसिक तणावाखाली आली होती. याच मानसिक तणावातून तरुणीने २३ जून रोजी दुपारी घरामध्ये कुणीही नसताना गळफास घेऊन आत्महत्या केली.

यावेळी तरुणीने पान २ वर

## विजेच्या धक्क्याने विद्यार्थिनीचा मृत्यु

**। भंडारा । वृत्तसंस्था ।**

भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील पुयार येथे एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या एका सहा वर्षीय चिमुकलीला विजेचा धक्का लागल्याची घटना घडली आहे. या घटनेत पहिल्या वर्गात शिकणाऱ्या या विद्यार्थिनीचा शाळेतच मृत्यू झाला आहे. ही दुर्दैवी घटना बुधवारी (दि.३) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडली. यशस्वी सोपान राऊत (वय ६ वर्ष, रा.पुयार) असं या मृतक विद्यार्थिनीचं नावं आहे.

शाळेच्या तिसऱ्याच दिवशी ही घटना घडल्याने सर्वत्र शोककळा पसरली असून राऊत कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. विदर्भातील जिल्हा परिषद आणि खासगी शाळांना १ जुलैपासून सुरुवात झाली. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत करण्याचे निर्देश शिक्षण विभागाने दिले होते. त्यानुसार सर्वत्र मोठ्या हर्ष उल्हासात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. मात्र नवीन शैक्षणिक सत्रातील तिसऱ्याच दिवशी जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेतील पहिल्या वर्गात शिकणाऱ्या एका चिमुकल्या विद्यार्थिनीचा शाळेतच विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. दरम्यान, लाखांदूर पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे.

## वैद्यकीय तपासणीसह कागदपत्रे पडताळणीनंतर होणार निवड

# जि.प. शाळांना मिळणार नवे शिक्षक

**। प्रमोद जाधव ।**
**। अलिबाग ।**

रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांचा तुटवडा असल्याने शिक्षणावर त्याचा परिणाम होत असल्याची ओरड कायमच आहे. मात्र आता ही ओरड थांबणार आहे. पवित्र पोर्टल प्रणालीद्वारे जिल्ह्यासाठी २३७ शिक्षक देण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांना आता नवीन शिक्षक मिळणार आहेत. वैद्यकीय तपासणीनंतर कागदपत्रे पडताळणीनंतर त्यांची वेगवेगळ्या शाळांमध्ये निवड केली जाणार आहे.




रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुमारे दोन हजार गावे, वाड्या आहेत. ग्रामीण भागाची लोकसंख्या सुमारे १६ लाख ६४ हजार इतकी आहे. जिल्हा परिषदेच्या पहिली ते आठवीपर्यंतच्या दोन हजार ५२८ शाळा असून ९१ हजार ३४३ अधिक विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम पाच हजार ८९० शिक्षक करीत आहेत. त्यात ४५ हजार २७० विद्यार्थी व ४६ हजार ७३ विद्यार्थिनींचा समावेश आहे.

जिल्ह्यात सूमारे एक हजारहून अधिक शिक्षक कमी आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेने कंत्राटी स्वरूपात सेवानिवृत्त शिक्षकांची निवड केली होती.मात्र एप्रिलपासून या शिक्षकांना पुन्हा कामावरून काढण्यात आले. त्यामुळे शिक्षकांच्या कमतरतेचा फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होण्याची भिती निर्माण झाली होती. परंतु पवित्र पोर्टलद्वारे नियमित शिक्षकांची भरती करण्यात आली. केली. जिल्ह्यासाठी दोनशे २३७ शिक्षक देण्यात आले. रायगड जिल्हा परिषद प्रशासनाकडून शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत हालचाली सुरु झाल्या आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिक्षकांच्या पान २ वर

> **पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी २३७ शिक्षकांची निवड केली आहे. कागदपत्रे पडताळणी पुढील आठवड्यात केली जाणार आहे. त्यानंतर समुपदेशन करून त्यांना शाळा दिल्या जाणार आहेत.**
> **पुनिता गुरव – शिक्षणाधिकारी, प्राथमिक विभाग**

# रायगडातील ७३८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक पाचवी व माध्यमिक आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेला जिल्ह्यातून पाचवीचे ९ हजार ९६४ तर आठवीचे ७ हजार २७ असे एकूण १६ हजार ९९१ विद्यार्थी सामोरे गेले होते. यामध्ये दोन्ही वर्गातील ७३८ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी अभिनंदन केले आहे.

१८ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) परीक्षेचा अंतरिम (तात्पुरता) निकाल ३० एप्रिल २०२४ रोजी जाहीर करण्यात आला होता. ३० एप्रिल ते १० मे २०२४ या कालावधीत गुणपडताळणीसाठीचे अर्ज संबंधित शाळेमार्फत ऑनलाईन मागविण्यात आले होते. या कालावधीत प्राप्त अर्ज निकाली काढून या परीक्षांचा अंतिम निकाल तयार करण्यात आला आहे. या अंतिम निकालावरून शासनमान्य मंजूर संचांच्या अधीन राहून शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करण्यात आली आहे.



जिल्ह्यात पाचवीच्या वर्गातील १० हजार ३७९ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी नोंदणी केली होती. यापैकी ९ हजार ९६४ विद्यार्थी परीक्षेला सामोरे गेले. त्यापैकी अंतिम पान २ वर

# विकासनामा वेब पोर्टलवर कारवाई करा

- **कर्जत तालुका शेकापची मागणी**
- **उपविभागीय पोलीस अधिकारी यांना दिले निवेदन**



। नेरळ । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या ध्येयधोरणांबाबत कोणत्याही कागदपत्रांची खातरजमा न करता विकासनामा या वेब पोर्टल प्लॅटफॉर्मवर आक्षेपार्ह वृत्त प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्याबाबत कर्जत तालुका शेतकरी कामगार पक्षाकडून नेरळ पोलीस ठाणे आणि कर्जत उपविभागीय पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्याकडे निवेदन देऊन दंडात्मक करवाई करण्याची मागणी केली आहे.

विकासनामा या वेब पोर्टलवर शेतकरी कामगार पक्षाची बदनामी करणारे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. त्यानिमित्ताने कर्जत तालुका शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस राम राणे यांनी कर्जत तालुका कार्यकारिणीची बैठक घेतली होती आणि त्यानंतर नेरळ पोलीस ठाणे आणि कर्जत पोलीस उप अधीक्षक कार्यालयात जाऊन विकासनामा प्लॅटफॉर्मवर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी कर्जत तालुका शेतकरी कामगार पक्ष उपाध्यक्ष रविंद्र भोईर, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक आणि कर्जत तालुका खरेदी विक्री संघाचे सभापती प्रकाश फराट, संचालक रवींद्र झांजे, पक्षाचे कार्यकर्ते नरेंद्र हजारे, बादशहा पाटील, दत्ता राणे, शंकर घोडविंदे, शेकाप युवक तालुका अध्यक्ष आणि अलिबाग बँकेचे संचालक अनिल जोशी, शेकाप अनुसूचित जमाती सेलचे जिल्हा उपाध्यक्ष बबन भालेराव, विभाग चिटणीस पांडुरंग बदे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्ष हा महाराष्ट्रातील प्रमुख प्रादेशिक पक्षापैकी एक पक्ष असून महाराष्ट्र व देशाचे सामाजिक व राजकीय जडण घडणीमध्ये प्रमुख भूमिका बजावलेला पक्ष आहे. पुरोगामी चळवळीचे माध्यमातून समाजातील तळागाळातील जनतेच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आजपर्यंत अनेक चळवळींच्या माध्यमातून शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आवाज उठवला आहे. शेतकरी कामगार पक्ष हा सामाजिक चळवळीचा वारसा असलेला पक्ष आहे. शेतकरी कामगार पक्ष हा समाजातील तळागाळातील लोकांमधून विकासाचे ध्येय घेवून अनेक युवा व जाणकार कार्यकर्ते असलेला आणि विशेष म्हणजे जनाधार असलेला पक्ष आहे. तथाकथित पत्रकारीता व्यवसायातील व्यक्तीने त्याचा विकासनामा या नावाने डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून बातम्या बदनामीकारक वृत्त प्रसिद्ध करत असल्याचे पोलिसांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

विकासनामा या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या बातमीमध्ये कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय शेतकरी कामगार पक्ष व शेतकरी कामगार पक्षाचे नेते यांच्या विषयी बदनामीकारक व वादग्रस्त बातमी प्रसिद्ध केलेली आहे. बातमीमध्ये तथाकथित पत्रकार यांनी पक्षाच्या लोकसभा निवडणुकीमधील तसेच विधान परिषद निवडणुकीमध्ये ध्येयधोरण विषयी व पक्षाच्या भूमिकेविषयी कोणत्याही कागदोपत्री पुराव्याशिवाय बदनामीकारक विधाने केलेली आहेत. त्यांच्या सदरच्या विधानामुळे शेतकरी कामगार पक्षाचे तालुका व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बदनामी झालेली आहे व जनमानसात पक्षाची प्रतिमा मलिन झालेली आहे.

पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असून पत्रकारितेच्या माध्यमातून समाजात जनजागृती करण्याचे काम केले जाते. मात्र विकासनामा या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या बातमी पत्रातील विधानामुळे शेतकरी कामगार पक्ष व आमचे जिल्ह्यातील नेते यांची मोठ्या प्रमाणात बदनामी झाली आहे. तालुक्यातील पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या भावना मोठ्या प्रमाणात दुखावल्या गेल्या आहेत. अशा बेसुमार पत्रकारितेला लगाम बसण्याकरीता त्यावर कायदेशीर कारवाई होणे गरजेचे आहे. अन्यथा शेतकरी कामगार पक्ष जनआंदोलन उभे करेल, असा इशारा कर्जत तालुका शेकापने दिला आहे.

# पीक विम्याच्या कामावर कृषी अधिकारी टाकणार बहिष्कार



। नेरळ । प्रतिनिधी ।

राज्यात १५ जून २०२३ पासून पी.एम. किसान योजनेचे समन्वय कृषी विभागाकडे दिले आहे. तालुका स्तरीय समितीचे प्रमुख समन्वयक म्हणून तालुका कृषी अधिकारी यांना जबाबदारी दिली आहे. त्यानुसार गेल्या वर्ष भरापासून राज्यातील सर्व तालुका कृषी अधिकारी व अधिनस्त अधिकारी, कर्मचारी शेतकरी हित लक्षात घेऊन पीएम किसानचे कामकाज गतिमानतेने करत आलो आहोत. परंतु सदर कामासाठी आवश्यक डाटा एन्ट्री ऑपरेटर, मुलभूत प्रशिक्षण, इतर आवश्यक सुविधा व कार्यालयीन खर्च मिळणेबाबत वारंवार वैयक्तिक व संघटना स्तरावरून लेखी निवेदन देऊन सदर कामावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

पीक विमा योजनेचे काम सदर योजनेचे काम कृषी विभाग करीत आहे. तरीदेखील शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या प्रचंड रोषास सामोरे जावे लागत आहे. कार्यालयीन, क्षेत्रीय कर्मचारी यांना पीएम किसानचे अतिरिक्त कामकाज लादले जात आहे. त्यामुळे संगणक व ऑपरेटर अभावी कार्यालयात अनेक वेळा विनाकारण शेतकऱ्यांशी वादाचे प्रसंग उद्भवत आहेत. तसेच, गाव पातळीवरील समितीचे समन्वयक कृषी सहायकांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण, सोयीसुविधा न देता अशक्य असलेल्या मोठया प्रमाणात स्प्रेडशिट, लाभार्थी याद्या भ्रमणध्वनीवर देऊन तात्काळ कामकाज करणेबाबत सूचना देण्यात येतात.

पी.एम.किसान योजनेच्या शासन निर्णयाप्रमाणे व मयत लाभार्थी यादीबाबतचे कामकाज संबंधित विभागामार्फत करणेबाबत कार्यवाही व्हावी. तसेच, क्षेत्रीय स्तरावर लॅपटॉप, टॅब देणेबाबतची कार्यवाही अद्यापही प्रलंबित आहे. क्षेत्र पातळीवरील अपुरे मनुष्यबळ व वरील सर्व कारणामुळे जिल्हयातील सर्व तालुका कृषी अधिकारी व अधिनस्त अधिकारी, कर्मचारी प्रचंड मानसिक तणावाखाली असून त्याचा परिणाम खात्याच्या केंद्र व राज्य पुरस्कृत योजना अंमलबजावणीवर होत आहे. १ जुलै २०२४ कृषी दिनापर्यंत पीएम किसान योजना राबविण्याबाबतच्या वरील अडचणी न सोडवल्यास सदर अतांत्रिक काम ावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्याचा विचार आहे.या आशयाचे निवेदन रायगड जिल्ह्यातील तालुका कृषी अधिकारी यांनी रायगड जिल्हाधिकारी यांना भेटून निवेदन दिले.

## पान १ वरून

## स्थानिकांना विश्वासात घ्या

उरण, पनवेल, पेण, येथील शेतकरी भूमीहीन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने अधिसुचनेला स्थगिती देण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही केली असा सवाल आ. जयंत पाटील यांनी सभागृहात उपस्थित केला.

यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, नवनगर म्हणून दर्शविण्याच्या अनुषंगाने प्रकल्पासाठी हरकती मागविण्यात आल्या होत्या. १७ हजार हरकती प्राप्त झाल्या आहेत. यांचा अहवाल तसेच पुणे येथील नगररचना विभागाचे संचालकांचा अभिप्राय विचार घेऊन फेरबदल प्रस्तावावर निर्णय घेण्याचे नियोजन केले असल्याचे सांगितले.

## अलिबागची पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करा

महाभियानांतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजना तसेच अस्तित्वातील जलवाहीनीच्या नूतनीकरणासाठी ५२.३८ कोटी रुपयांचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. त्याची कार्यवाही मुख्याधिकारी यांच्याकडून सुरु आहे. या प्रकल्पाच्या प्रस्तावर तांत्रिक व इतर प्रशासकीय बाबींच्या पुर्ततेसह शासनाला प्राप्त झाल्यानंतर नगरोत्थान महाभियानांतर्गत विचारात घेण्यात येणार असल्याची ग्वाही शिंदे यांनी दिली.

## ३२८ कोटींच्या ड्रग्सचं रॅकेट सापडलं

बातमीदाराकडून माहिती मिळाली की, दोन इसम ठाणे घोडबंदर मार्गे मिरा भाईंदरमध्ये एम.डी.विक्री करण्यासाठी येत आहेत. त्याच अुनंषगाने क्राईम युनिट १ ने द्वारका हॉटेल येथे चेना गावाजवळ आरोपी शोएब हनीफ मेमन आणि निकोलस लिओफ्रेड टायटस यांना पकडलं असता. त्यांच्याजवळून २ कोटी किंमतीचे एम.डी. ड्रग्स मिळून आलं. दोघांच्याविरोधात एन.डी.पी.एस.कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आणि तपासात मोठं रॅकेट उद्ध्वस्त करण्यात क्राईम युनिटला यश आलं. आरोपी शोएबने दिलेल्या माहितीनुसार आरोपी दयानंद उर्फ दया माणिक मुद्दनार राहणार हैद्राबाद आणि नासीर उर्फ बाबा जानेमियॉ शेख यांना हैद्राबाद, तेलंगणा येथून या दोघांना अटक केली. यातील दयानंद उर्फ दया याची नरसापुर जिल्हा विकाराबाद तेलंगणा येथे एम.डी. बनविण्याची फॅक्टरी निघाली. त्या फॅक्टरीत पोलिसांनी छापा टाकून, तेथून २५ कोटींचे कच्चे एम.डी., केमिकल्स आणि एम.डी. बनवण्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले. तोच धागा पकडत क्राईम युनिट १ ने तापासाची चक्रे वेगाने फिरवत गेली.

**कारमध्ये १४ लाख ३८ हजार किंमतीचं एम.डी**

आरोपी दयाने दिलेल्या माहितीनुसार घनश्याम रामराज सरोज याला उत्तर प्रदेश येथील वाराणसी येथून ताब्यात घेतलं. त्याचबरोबर मोहम्मद शकील मोहम्मद मोईन तेलंगणा येथे राहणाऱ्याला मुंबईच्या गोरेगाव येथून त्याच्या स्विफ्ट कारसह ताब्यात घेतलं. त्या कारमध्ये पोलिसांना १४ लाख ३८ हजार किंमतीचं एम.डी. ड्रग्स सापडलं. त्याचबरोबर दयाने आणखीन दिलेल्या माहितीनुसार, भरत उर्फ बाबू सिध्देश्वर जाधव याला भिवंडीच्या गणेशपूरी येथून अटक केली. तो राहत असलेल्या ठाण्यातील पडगा येथील लाप या गावी त्याच्या घरातून ५३,७१० रुपयाचे एम.डी. बनवण्यासाठी लागणारे साहित्य आणि केमिकल्स जप्त करण्यात आलं.

**दुबई ते मुंबईचा प्रवास**

पोलिसांना त्यानंतर ही तपासामध्ये एम.डी. बनवण्यासाठी लागणारे पैसे व एम.डी. विकून मिळालेले पैसे याची देवाण-घेवाण करणारा दाउदचा मुख्य हस्तक सलीम डोळा याची लिंक लागली. हाच सलीम दुबईहून भारतात एम.डी. ड्रग्सचे जाळं पसरवण्याचे काम करत असल्याचं निष्पन्न झालं. तोच धागा पकडत गुजरातच्या सुरत येथे राहणारा आरोपी झुल्फीकार उर्फ मुर्तुझा मोहसीन कोठारी याच्याकडे आरोपी सलीम डोळा याने पाठविलेले १० लाख ८४ हजार रोख रक्कम जप्त केली. तसेच काही रक्कम मुंबईच्या अंगडीया हवालामार्फत पाठवण्यात आल्याचं ही निष्पन्न झालं. यात मुंबईच्या भेंडी बाजार येथे राहणाऱ्या मुस्तफा युसुफभाई फर्निचरवाला आणि हुसैन मुस्तफा फर्निचरवाला यांच्याकडून ही ६ लाख ८० हजाराची सलीम डोळा याने पाठवलेली रक्कम जप्त केली.

## गॅसचा टेम्पो दरीत कोसळला

सुमारे ७० फूट दरीत कोसळला. या अपघातात चालक अफिझुर रेहमान हा जखमी झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच कशेडी महामार्ग पोलीस मदत केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक प्रविण धडे, उपनिरीक्षक समेळ सुर्वे, पोलीस हवालदार चिकणे, रामागडे, माजलकर यांच्यासह पोलादपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल जाधव, सहाय्यक फौजदार जयसिंग पवार, पोलीस हवालदार रविंद्र सरणेकर, पोलीस हवालदार घुले, ट्रॅफिक हवालदार धायगुडे, १०८ रुग्णवाहिकेची संपूर्ण टीम, महाड नगर परिषद आणि महाड एमआयडीसी येथील अग्निशामक यंत्रणेला कशेडी व पोलादपूर पोलिसांनी पाचारण केले. येथील तीन अग्निशामक बंब घटनास्थळी तातडीने पोहोचले. महामार्ग पोलिसांनी दोन्ही बाजूची वाहतूक सतर्कता बाळगत सुरू ठेवली होती.

## जि.प. शाळांना मिळणार नवे शिक्षक

कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. त्यानंतर समुपदेशन करून या शिक्षकांची नेमणूक जिल्ह्यातील शाळांवर केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे. जिल्हा परिषद शाळांना आता नवीन शिक्षक मिळणार आहेत. ज्या शाळांमध्ये पटसंख्या असूनदेखील शिक्षकांची कमतरता जाणवत आहे. त्या शाळांमध्ये आता शिक्षक येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शिक्षण विभाग काय भूमिका घेणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

## उमटे धरणाच्या संरक्षक भिंतीचे काम सुरु

सध्या पावसाला सुरुवात झाली आहे. दोन महिन्यांआधी शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई व अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या माध्यमातून धरणातील गाळ काढण्यात आला होता. त्यामुळे धरणात लाखो लिटर पाण्याचा अतिरिक्त साठा होण्यास मदत मिळणार असल्याचे उमटे धरण संघर्ष ग्रुपचे ॲड. राकेश पाटील यांनी सांगितले. गाळ काढल्याने पाण्याचा अतिरीक्त साठा होणार आहे. त्यातच धरणाच्या भिंतीची दुरवस्था झाली आहे. भिंतीला भलेमोठे भगदाड पडल्याने ४७ गावे आणि ३३ आदिवासी वाड्यांना धोका निर्माण झाला आहे. याबाबत कृषीवलने याचा सातत्याने पाठपुरवा सुरुच ठेवला होता. तसेच ॲड.राकेश पाटील यांनी याबाबत तक्रारही दाखल केली होती.

जिल्हा परिषदेच्या कामकाजावर नागरिकांमध्ये टीका होऊ लागल्यामुळे रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी संजय वेंगुर्लेकर यांच्यासह अन्य अधिकारी उमटे धरणावर प्रत्यक्ष जाऊन त्यांनी पाहणी केली. त्यानंतर उमटे धरणाच्या भिंतीच्या कामाला सुरुवात करण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण आहे.

धरणाच्या भिंतीचे काम सुरु करण्यात आले असले, तरी त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात चिखल साठलेला आहे. त्यामुळे बांधकामाचे साहित्य पोचवण्यात संबंधितांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. सध्या दोन ट्रॅक्टर-ट्रॉलीच्या मदतीने साहित्य पोचवण्यात येत आहे. अधुनमधून पाऊस पडत असल्याने कामात व्यत्यय येत असल्याचे दिसून येते.

## प्रेयसीची आत्महत्या; प्रियकराला अटक

आत्महत्येपूर्वी आपल्या २ बहिणींसाठी तसेच विजय गोरे याच्यासाठी अशा ३ चिठ्ठ्या लिहून ठेवल्याचे आढळून आले. विजय गोरे याच्यासाठी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये तरुणीने अनेक गोष्टी लिहून ठेवल्याचे आढळून आले. यावरुन विजय गोरे याने दिलेल्या मानसिक त्रासामुळे सदर तरुणीने आत्महत्या केल्याचे आढळून आल्यानंतर तिच्या कुटुंबियांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात विजय गोरे याच्या विरोधात तक्रार दाखल केली.

## रायगडातील ७३८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

निकालानंतर ३७५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. आठवीच्या वर्गातील ७ हजार ३३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी ७ हजार २७ विद्यार्थी परीक्षेला सामोरे गेले होते. यामधील अंतिम निकालानंतर ३४२ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. दरम्यान, शिक्षण विभागाच्या वतीने शाळा स्तरावर विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करून घेण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. त्यानुसार जिल्हा परिषदेसह खासगी शाळांमधील या परीक्षेत घवघवीत यश संपादित केले आहे.

अलिबाग तालुक्यातील ६४ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून, कर्जत ३०, खालापूर ३७, महाड १२५, माणगाव ७०, म्हसळा ५, मुरुड ८, पनवेल १९३, पेण ५०, पोलादपूर १७, रोहा ५९, सुधागड ७, श्रीवर्धन ७, तळा १२, उरण ५३ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत.

## आरटीई प्रवेशाला दिरंगाई

कोणतीही सूचना किंवा माहिती मिळत नाही. न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत प्रवेश नाकारणे, तर कधी सरकारकडून प्रवेशप्रक्रियेत बदल होणे. त्यात आता शाळा सुरू होऊनही प्रवेशाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे यंदा आरटीई प्रवेशाच्या अडथळ्यांचा टप्पा काही संपत नाही. राज्य सरकारच्या आरटीई शिक्षण कायद्यांतर्गत अनेक वर्षांपासून दुर्गम भागातील मुले खासगी इंग्रजी शाळेत शिक्षण घेत आहेत. यंदा मात्र माशी कुठे शिंकली कळत नाही. हे सरकार सामान्यांचे असताना गरीब विद्यार्थ्यांना या सुधारित शिक्षण पद्धतीने शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. यात आरटीई प्रवेशाबाबत होणाऱ्या दिरंगाईमुळे पालक हैराण झाले आहेत. याबाबतचा निर्णय लवकर व्हावा, अशी अपेक्षा पालक व्यक्त करत आहेत.आरटीई प्रवेशप्रक्रिया न्यायालयाच्या सुनावणीमुळे लांबणीवर पडली आहे. अनेक विद्यार्थी आरटीई प्रवेशामुळे शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती वर्तवण्यात येत आहे. अर्जदार विद्यार्थी घरीच असल्याने त्यांना दुसऱ्या शाळेत प्रवेशही घेता येत नाही. आज निकाल लागेल, उद्या लागेल या आशेवर अनेक पालक आहेत.

## हेमंत सोरेन पुन्हा मुख्यमंत्री होणार

झामुमोचे कार्याध्यक्ष बनवले जाऊ शकते. सध्या हेमंत सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाचे (जेएमएम) कार्याध्यक्ष आहेत.

जमीन घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात त्यांना अटक झाल्यानंतर २८ जून रोजी हेमंत सोरेन यांची तुरुंगातून सुटका झाली आहे. हेमंत सोरेन यांनी राजीनामा दिल्यानंतर त्यांचे निकटवर्तीय चंपाई सोरेन यांना मुख्यमंत्री करण्यात आले होते. चंपाई सोरेन यांनी २ फेब्रुवारी रोजी राज्याचे १२ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती.

## उनाड गुरांचा त्रास

**अलिबाग :** शहरात उनाड गुरांचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. गुरांचे मालक गुरांना मोकाट सोडून देत असल्याने शहरातील रस्त्यांवर दिसून येतात. त्यामुळे वाहतूक कोंडी होते.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री.सुरेश देवराम चव्हाण वगैरे १ रा.कळवा यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेकमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-आसरे, ता.सुधागड, जि.रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| ३ | ०-३३-०० | २.१८ |

पैकी विक्री क्षेत्र ०-१६-५० हे.आर.

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा गहाण, दान, बक्षीस वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७(सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०४/०७/२०२४

सही/-
**ॲड.समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो नं. ९४०३३०५२५०

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत. मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. जयंत विश्वनाथ पालशेतकर, २. दिलीप विश्वनाथ पालशेतकर यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मुशेत ता. अलिबाग जि. रायगड | ४१ | ०-४७-६० पो.ख. ००-०२-८० एकूण ००-५०-४० | ६.६२ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागीदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसारपावती, वारसाहक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ३/७/२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु. नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग, पैकी गाव नांदाईचा पाडा (मूळ गाव आगरसुरे) येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती आमचे अशिल विश्वनाथ शिवराम पाटील मु. फकिरपाडा आणि इतरांच्या सहमालकीच्या जमिनी असून मूळ पुरूष कै. धर्मा अर्जुन पाटील यांचेकडून सदर जमिनी वारसा हक्काने आल्या आहेत.

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १ | १७७ | ०-२६-३ | ५=१० |
| २ | १७९ | ०-७१-७ | २=३५ |

कै. धर्मा अर्जुन पाटील यांचे वारसांपैकी काही जणांची नावे आजमितीस सदर जमिनीचे ७/१२ उताऱ्यावर लावण्यात आली असली तरी सर्व वारसांचा सदर जमिनींमध्ये कायदेशीर हक्क आहे. कै. धर्मा अर्जुन पाटील यांचा मयत मुलगा कै. गोविंद धर्मा पाटील हे आमचे अशिलांचे आजोबा आहेत.

सदर मिळकतींचे ७/१२ कडे नाव असणाऱ्या सहमालकांचा जमिनींची विक्री करण्याचा प्रयत्न चालू असल्याचे आमचे अशिलांस खात्रीलायकरित्या समजले आहे. त्याकरिता आमचे अशिल अलिबाग येथील दिवाणी कोर्टात वाटपाकरीता आणि मनाई हुकुमाकरीता लवकरच दावा दाखल करण्याचे विचारात आहेत. आमचे अशिलांचा आणि इतर सहहक्कदारांचा कायदेशीर हक्क डावलून अशाप्रकारे विक्री व्यवहार झाल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत राहील आणि असा व्यवहार करणार यांचेविरूद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई आमचे अशिल करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : ०४/०७/२०२४

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा को.ऑप. हौसिंग सोसायटी,
मारूती नाका, अलिबाग, रायगड

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत. मिळकतीचे विद्यमान मालक दिलीप शंकर म्हात्रे यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| सागाव ता. अलिबाग | १०२ | एकूण क्षेत्र ०-३४-०० | २३.२९ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागीदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसारपावती, वारसाहक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २/७/२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु. नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कोंदिवडे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालक अमेय श्रीराम कुर्डुकर यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ३४ | १/अ/३ | ०-०७-०० | ०-०८ |
| ३६ | २/अ/२ | ०-५६-८० | ४-५६ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/०७/२०२४

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी
दिनकर-निमकर अपार्टमेंट
बाजारपेठ कर्जत, ता.कर्जत
जि.रायगड-४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका मुरूड पैकी गाव उसरोली येथे खालील वर्णनाची मिळकत आहे.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| ४११ | - | ०-७३-३० पैकी ०-४०-३० | १५=२५ |

सदर मिळकतीपैकी बशिर उमर परकार यांचे मालकीचे ०-४०-३० हे.आर. इतके क्षेत्र आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर व्यवहार पूर्ण करणेपूर्वी सदर मिळकतींमध्ये त्रयस्थ व्यक्तीची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरीता ही नोटीस देण्यात येत आहे.

तरी, सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसात नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : ०४/०७/२०२४

सही/-
**ॲड. संजीव अनिल घरत,**
ऑफिस पत्ता : मु.पो. खंडाळे,
तालुका अलिबाग जिल्हा रायगड ४०२२०९

निवडक

## मंगळसूत्राची चोरी

**पनवेल :** सूकापूर येथील माळेवाडी या परिसरातील कार्तिक्य अपार्टमेन्टमध्ये राहणाऱ्या ३४ वर्षीय महिला सोसायटीच्या प्रवेशद्वाराजवळून जात असताना ३० ते ३५ वर्षांचा चोरटा दुचाकीवरुन येऊन महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपयांचे मंगळसूत्र खेचून पसार झाला. हा प्रकार खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला असून याबाबत पिडीत महिलेने पोलीसांकडे तक्रार नोंदविली आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत चोरट्यांचा शोध घेत आहेत.

## लघुपटाचा शुभारंभ

**पनवेल :** सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या नवीन पनवेल येथील के.आ. बांठीया माध्यमिक विद्यालयाच्या सभागृहात आर्ट फॅक्टरी एन्टरटेन्मेंट पुणे निर्मित प्रेषित पवार यांनी दिग्दर्शित केलेल्या 'प्रयत्न' या शालेय जीवनावर आधारित लघुपटाचे श्रीवर्धन पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या लघुपटाचे चित्रीकरण बांठीया शाळेत झाले असून यामध्ये असलेले कलाकार हे बांठीया शाळेतील शिक्षक व विद्यार्थी आहेत.

## पनवेलमध्य लेडीज बार बंद

**पनवेल :** रात्री उशिरापर्यंत सुरू असणारे लेडीज बार चर्चेचा विषय ठरत असून पावसाळी अधिवेशन सुरू असताना पनवेलमधील लेडीज बार बारचालकांकडून बंद ठेवण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे सोशल क्लब सुद्धा बंद ठेवण्यात आले आहेत. तालुक्यात एकूण २४ सर्व्हिस आणि ऑर्केस्ट्रा बार आहेत. यामध्ये पनवेल तालुका पोलिस अंतर्गत १०, पनवेल शहर पोलिस अंतर्गत ९, कळंबोली ३ आणि तळोजा पोलिस ठाण्याच्या अंतर्गत २ बारचा समावेश आहे.

## मोटारसायकलचा अपघात

**रसायनी :** मोहोपाडा येथे आयशर टेम्पो (डीडी-०३-एल-९४५७) चालकाने हादांड फाटा बाजुकडे जात असताना अचानक उजव्या बाजुला घेऊन ब्रेक मारल्याने त्याच्या मागुन येणारी मोटारसायकल (एमएच-४६-क्यु-७५९९) या टेम्पोला धडकली. या धडकेत मोटारसायकल चालकाच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई वसंत म्हामुणकरहे करीत आहेत.

## म्हसळ्यात रिक्षाचा अपघात

**म्हसळा :** येथील जान्हवी पेट्रोल पंपाजवळ रिक्षा (एमएच-०६-बीव्ही-२१६१) आणि मोटारासायकलचा अपघात झाला आहे. मोटारसायकल (एमएच-४७- आर-८२५०) चालक बेदरकारपणे वेगात चालवित घेउन समोरून जाणाऱ्या स्कुलबसला ओव्हरटेककरून समोरून येणाऱ्या रिक्षाला धडक दिली. या अपघातात मोटारसायकल चालकाच्या व त्याच्या सहाकऱ्याच्या पायाला व हाताला दुखापत झाली असून दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. याबाबत म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्रकल्पग्रस्तांना न्याय द्या

## आ. जयंत पाटील यांची मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यातील साळाव येथील जेएसडब्लू प्रकल्पामुळे बाधित झालेले शेतकरी गेल्या अनेक वर्षापासून त्यांच्या न्याय हक्कासाठी लढा देत आहेत. मात्र, अद्याप ठोस कार्यवाही झाली नाही. त्यामुळे शेतकरी न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांना तातडीने न्याय द्या, अशी मागणी शेकापचे आ. जयंत पाटील यांनी तारांकित प्रश्नातून केली आहे. त्यावर मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी सांगितले की, एक सदस्यीय समितीचा अहवाल कार्यवाहीसाठी उद्योग विभागाकडे पाठविण्यात आला आहे. मात्र, त्यांचा अभिप्राय प्राप्त झाला नसल्याने कार्यवाही झाली नसल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले.

मुरूड तालुक्यातील चेहेर, नवीन चेहेर, मिठेखार, वाघुळवाडी, निडी, साळाव येथील जेएसडब्लू प्रकल्पामुळे १९८९ मध्ये दोनशे व २००९ मध्ये १२६ असे एकूण बाधित झालेले ३२६ प्रकल्पग्रस्त शेतकरी मागील ३० वर्षापासून त्यांच्या मागण्यांसाठी निवेदनाद्वारे पाठपुरावा करीत आहे. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १७ ऑगस्ट २०२३ रोजी बैठक झाली. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची एक सदस्य समिती तयार करून महिन्याच्या आत बाधित शेतकऱ्यांच्या संदर्भातील अहवाल तयार करण्याचे आदेश दिले होते. अखेर या शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी कोणतीही कार्यवाही केली असा सवाल आ. जयंत पाटील यांनी सभागृहात उपस्थित केला. त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील म्हणाले की, प्रकल्पग्रस्त यांच्या मागण्याच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली होती. एक सदस्य समितीचा अहवाल उद्योगमंत्र्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला आहे. त्या संदर्भात उद्योग विभागाकडे अभिप्राय मागितले असता, तो अहवाल कार्यालयास प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी सांगितले.



# भुसंपादनाची प्रक्रिया जलदगतीने होणार

## आ. जयंत पाटील यांच्या मागणीची बांधकाम मंत्र्यांकडून दखल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पाली येथील बाह्यवळणाच्या रस्त्याला निधीची मंजूरी असताना संबंधितांकडून कार्यवाही करण्यात आली नाही. त्याबाबत शेकापचे नेते आ. जयंत पाटील आक्रमक झाले. त्यांनी अधिवेशनात या मुद्यावर चर्चा करून सभागृहाचे लक्ष वेधले. तसेच, काम न करणाऱ्या संबंधितांविरोधात कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी बांधकाममंत्री चव्हाण यांनी दुजोरा देत भुसंपादनाची प्रक्रीया जलदगतीने केली जाणार असल्याचे आश्वासन दिले. सुधागड तालुक्यातील पाली येथील बाह्यवळण मार्गाला १४ वर्षापूर्वी मंजूरी दिली आहे. रस्त्यासाठी शासनाने १८ कोटी रुपये आणि भूसंपादनासाठी दहा कोटी रुपयांच्या निधीला मंजूरी देण्यात आली आहे. बाह्यवळणाच्या भूसंपादनासाठी नऊ हेक्टर जागा संपादीत करण्यात आली आहे. पाली, बलाप, बुरमाळी, झाप येथील भुसंपादन जागेचे मुल्यांकन करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावावर जिल्हाधिकारी यांच्याकडून कोणती कार्यवाही केली असा प्रश्न उपस्थित करीत बाह्यवळण मार्गास १४ वर्षापूर्वी मंजूरी देऊनही या मार्गाचे काम न करणाऱ्या दोषींविरोधात करण्यात यावी, अशी मागणी शेकाप आ. जयंत पाटील यांनी केली.

यावर बांधकाममंत्री रविंद्र चव्हाण यांनी पाली बाह्यवळणाच्या भुसंपादनासाठी जागा संपादीत केल्याचे कबूल केले असून प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडेही पाठविण्यात आल्याचे सांगितले. तसेच, झाप व बुरमाळी गावांच्या मुल्यांकनास जिल्हास्तरिय मुल्यांकन समितीकडून मंजूरी मिळाली आहे. पाली व बलाप या प्रस्तावास त्रुटी असल्याने नव्याने प्रस्तावर सादर करण्यात येत आहे. बाधित शेतकऱ्यांच्या हरकतींमुळे मोजणी वेळेत न झाल्यामुळे रस्त्याच्या आराखड्यांबाबत शेतकऱ्यांमध्ये दुमत असल्याने भुसंपादन प्रक्रीया पुर्ण झाली नाही. रस्त्याच्या भूसंपादनाची प्रक्रीया जलदगतीने पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले.

# अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन

## ■ जि.प. तर्फे माझी लाडकी बहिण योजनेची जनजागृती सुरु

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



तालुक्यातील अंगणवाडी सेविकांना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना २०२४' या योजनेसंदर्भात एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प यांच्यावतीने चेंढरे ग्रामपंचायतच्या सभागृहात मंगळवारी (दि.०२) जनजागृतीसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत योजनेच्या परिपत्रकाचे वाचन करून योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे योजनेच्या परिपत्रकाची माहिती देत मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा व महिला बालविकास अधिकारी विनीत म्हात्रे, प्रकल्प अधिकारी गितांजली पाटील, विस्तार अधिकारी विजय मयेकर, जिल्हा महिला बालविकास पर्यावेक्षिका अधिकारी साळुंखे, पर्यवेक्षिका विनोदीनी मोकल, सामिया पेरेकर, दीप्ती मोकल, कल्पिता साळगावकर आणि अंगणवाडी सेविका उपस्थित होते.

यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विनीत म्हात्रे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेचे महत्व, उद्देश, लाभार्थी, योजनेच्या पात्रतेच्या अटी, निकष, आवश्यक कागदपत्र, पात्र व अपात्रतेचे निकष, आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांच्या पूर्ततेबाबतच्या येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय, पर्याय आदी विविध विषयांवरील सखोल मार्गदर्शन केले. प्रकल्प अधिकारी गितांजली पाटील यांनी सांगितले की, योजना राबवित असताना अंगणवाडी सेविकेवर महत्त्वपूर्ण जबाबदारी असणार आहे. प्रत्येक अंगणवाडी सेविकांनी सतर्क असणे आवश्यक आहे. तर, आपल्या कार्यक्षेत्रातील एकही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची काळजी प्रत्येक अंगणवाडी सेविकांनी घेतली पाहिजे.

# बहिणींची दाखल्यासाठी गर्दी

**। म्हसळा । वार्ताहर ।**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना राज्य सरकारने जाहीर केल्यानंतर महिलांनी अर्ज भरणे व त्यासाठी लागणारे कागद पत्र मिळविण्यासाठी तहसील कार्यालयावर प्रचंड गर्दी केली होती. शासनाच्या नवीन सुधारित आदेशानुसार ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज भरून या योजनेचा लाभ घेण्यासाठी तहसील कार्यालयात बहिणींच्या लांब रांगा लागत आहेत. दुसरीकडे शाळा, महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याने पालकांचीही आवश्यक दाखल्यांसाठी तहसील कार्यालयात झुंबड सुरू आहे. मात्र, लाडकी बहीण योजनेच्या गर्दीत विद्यार्थ्यांचा शिक्षणासाठी आवश्यक दाखले मिळविताना पालकांची दमछाक होत आहे.

सध्या शाळा, महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याने विद्यार्थ्यांसाठी उत्पन्नाचा दाखला घेण्यासाठी पालकांचे हेलपाटे सुरू आहेत. मात्र, महिलांची तहसील कार्यालयात गर्दी वाढल्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले मिळविण्यास उशीर होत आहे. याबाबत पालकवर्गात नाराजीचा सूर आहे. यावेळी सेतू कार्यालयात विद्यार्थी वर्गासाठी वेगळी खिडकी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.





# तहसील कार्यालयात दाखल्यांसाठी गर्दी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

दहावी तसेच बारावीच्या निकालानंतर पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची लगबग सुरु झाली आहे. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे दाखले काढण्यासाठी विद्यार्थ्यांसह पालकांची तहसील कार्यालयात गर्दी होऊ लागली आहे. लाडकी बहिण योजनेसाठी लागणाऱ्या कागदपत्रांसाठी देखील महिलांची सुध्दा गर्दी होऊ लागली आहे.

दहावी व बारावीच्या निकालानंतर काहींनी कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यास सुरुवात केली आहे. काहींनी व्यवसायिक शिक्षण घेण्यावर भर दिला आहे. या प्रवेशासाठी जातीचा दाखला, नॉन क्रिमिलेअर, उत्पन्नाचा दाखला अशा अनेक प्रकारच्या दाखल्यांची गरज निर्माण झाली आहे. हे दाखले काढण्यासाठी पालकांसह विद्यार्थ्यांची धावाधाव सुरु झाली आहे. मुदतीच्या अगोदर दाखले मिळावे यासाठी तहसील, उपविभागीय कार्यालयात सकाळपासून पालकांसह विद्यार्थ्यांची गर्दी होऊ लागली आहे.

सध्या शेतीच्या कामांची लगबग सुरू आहे. मुलांना पुढील शिक्षणासाठी दाखले मिळावे यासाठी शेतकऱ्यांसह नोकरी व्यवसायासाठी असलेले पालक तहसील कार्यालयात दाखल्यांसाठी दिसत आहेत. त्यामुळे तहसील कार्यालयाच्या सेतू कार्यालयात दाखल्यांसाठी प्रचंड गर्दी होत आहे. दाखल्यांसाठी लागणारे कागदपत्रे गोळा करून सेतू कार्यालयात जमा करण्यासाठी रांगच रांग दिसून येत आहे. त्यात सरकारने लाडकी बहिण योजनेसाठी लागणारे दाखले मिळविण्यासाठी देखील महिलांची गर्दी होऊ लागली आहे. मात्र, काही तलाठी व कोतवालकडून दाखल्यांसाठी कागदपत्रांची पुर्तता करताना टाळाटाळ होत असल्याची खंत काही महिलांनी व्यक्त केली आहे.



# ग्रामीण जीवनोन्नती अभियान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रराज्यग्रामीणजीवनोन्नती अभियान (उमेद) संचलित स्वराज्य महिला प्रभाग संघ केळवणेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकताच पनवेल तालुक्यातील युसुफ मेहरअली सेंटरचे मधु प्रमिला दंडवते संकुल बांधनवाडी येथे संपन्न झाली. या सभेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून शैलेश कोंडसकर, विवेक भोपी, संतोष ठाकूर, अनिल कांबळे, निकिता भोईर, अनंत उघडे, साधना वाजेकर, तुकाराम गायकवाड, जयवंत महाडिक, मिलिंद बाचल, पूर्वा कदम, मयुरी म्हात्रे आदींनी मार्गदर्शन केले. यावेळी उत्कृष्ट गट व्यवसाय श्रीसमर्थ स्वयं सहाय्यता समूह बारापाडा, उत्कृष्ठ उद्योजिका कासारभट येथील योजना पाटील यांच्यासह उत्तम वाटचाल करणाऱ्या १४ ग्रामसंघ व १४ सीआरपींना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

## नवी मुंबईतील पोलिसांच्या बदल्या

**। पनवेल । वार्ताहर ।**

राज्यातील पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकारी यांच्या झालेल्या बदल्यांमध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात कार्यकाळ पूर्ण झालेल्या ८ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. तर, नव्याने १७ पोलीस निरीक्षक नवी मुंबईत दाखल होणार आहेत. बदली झालेल्या अधिकाऱ्यांना संबंधित घटक प्रमुखांनी त्यांच्या बदलीवर येणाऱ्या अधिकाऱ्यांची वाट न पाहता त्यांना तत्काळ कार्यमुक्त करण्याचे सूचित केले आहे. तसेच, जे पोलीस अधिकारी वेळेत बदलीवर हजर होणार नाहीत, अशा अधिकाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

# अनधिकृत पार्किंगवर कारवाई

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण-पनवेल महामार्गावरील उरण, दास्तानफाटा, चिर्ले, धुतुम व जासई येथील शंकर मंदिर परिसरात उरण वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक वैशाली गलांडे यांच्या पथकाने रस्त्यावर बेकायदेशीरपणे उभ्या असलेल्या अवजड ट्रेलर पार्किंगला आळा घालण्यासाठी दंडात्मक कारवाईचा धडाका लावला आहे. मागील सहा महिन्यांच्या कालावधीत उरण वाहतूक पोलिसांनी ७ हजार ३८९ अवजड वाहनांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. त्याचप्रमाणे माहामार्गांवर अवजड वाहने पार्किंग न करण्याचे आवाहनही अवजड चालक मालकांना करण्यात आले आहे.



तर, न्हावाशेवा वाहतूक पोलिसांच्या हद्दीत रस्त्यावर बेकायदेशीर पार्किंग होणाऱ्या वाहनांवर वरिष्ठ पोलिस निरीक्षक जी. एम. मुजावर यांच्या वाहतूक पोलिसांनी धडक कारवाई सुरु केली असून, ट्रान्सपोर्ट चालक व मालक यांनी आपली वाहने रस्त्यावर उभी न करता जेएनपीएने बनविलेल्या पार्किंगमध्ये उभी करावी, असे आवाहन मुजावर यांनी केले आहे. तसेच, यापुढे कोणीही अवजड वाहने रस्त्यावर उभी करून ठेवल्यास या वाहनांवर कायदेशीर दांडात्मक कारवाई केली जाईल, असे बजावले आहे.

# विलोभनीय जंजिरा जलदुर्ग



**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

अपराजित राहिलेला मुरूडचा जंजिरा जलदुर्ग आजही पर्यटक आणि इतिहासकारांतुन विविध कारणांमुळे लोकप्रिय आहे. पावसाळ्यात तर या जंजिरा किल्ल्याचे रुप अधिक खुलून व विलोभनीय दिसत आहे.

दरवर्षी २५ मे पासून ३१ ऑगस्टपर्यंत केंद्रीय पुरातत्व खात्याकडून जंजिऱ्यात जाण्यास बंदी असते. पाऊस पडल्यानंतर जंजिऱ्यावर हिरवीगार साज चढते. मुरूडकडून राजपुरी जेट्टीकडे जाताना ही विलक्षण ऐतिहासिक वास्तू मोबाईलमध्ये बंदिस्त करण्यासाठी डोंगरी सनसेट पॉईंटजवळ पाय थबक असतात. समुद्राच्या मोठ्या धडकणाऱ्या लाटा गेली ३५० वर्षे जंजिरा जबरदस्त आणि चिवटपणे झेलतो आहे. पावसाळ्यात जंजिरा पर्यटकांना आतून पाहण्यासाठी बंद असला तरी हिरवागार शालू पांघरून पहुडलेल्या जंजिऱ्याचे बाह्यरूप आणि धडकणाऱ्या लाटांचे तांडव पाहताना नेत्रसुखद रोमांच उभे राहतात.

## सेवानिवृत्त शिक्षक जगदीश चोरगे यांचे गौरवोद्गार

# नागाव शाळेने भरपूर प्रेम दिले

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**गेल्या अनेक वर्षापासून शाळेत शिक्षक म्हणून सेवा करण्याची संधी मिळाली. शाळेतील मुख्याध्यापक व अन्य शिक्षकांचे चांगल्या पध्दतीने सहकार्य मिळाले. ज्ञान दिल्याने वाढते या भुमिकेतून विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम केले. शाळेने भरपूर प्रेम दिले असे प्रतिपादन सेवानिवृत्त सहाय्यक शिक्षक जगदिश शामराव चोरगे यांनी केले.**

जगदिश चोरगे यांचा सेवापूर्ती सदिच्छा सोहळा नागाव येथील हायस्कूलमध्ये मंगळवारी (दि.२) आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष एम.एन. पाटील, सचिव माणिक सावंत, माजी मुख्याध्यापिका अंजली आठवले, कुमार ससाणे, सावंत, कदम, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका भावेश्री वाळंज, सहशिक्षिका मंजुषा पाटील, जान्हवी बनकर, सुप्रिया पाटील, तनिष्का नाईक, वर्षा पाटील, मोहन पाटील, कासार, गिरी, रश्मी नागांवकर, तसेच चोरगे कुटूंबिय व त्यांचे सहकारी गजानन पाटील, माजी विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यापुढे मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, अलिबाग तालुक्यातील मांडवा येथील रहिवासी आहे. १९८८ ला नागाव हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू झालो. शिक्षक म्हणून सेवा देत असताना, विद्यार्थी चांगल्या पध्दतीने घडला पाहिजे या भुमिकेतून काम केले. विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडल्यावर समाजात खंबीरपणे उभा राहिला पाहिजे, त्या पध्दतीने त्यांना शिकविण्यासाठी कायमच धडपड केली. त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडविण्याचेदेखील काम केले आहे. शाळांमध्ये राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये शिक्षक म्हणून मुख्याध्यापक आणि शाळेने विश्वासनाने जबाबदारी टाकली. ती जबाबदारी खंबीरपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला. शाळेतील शिक्षकांनीदेखील चांगले सहकार्य केले. आज ३६ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त होत असताना दुःखही होत आहे. कारण गेली अनेक वर्षे विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या सहवासात अधिक वेळ घालविला. त्यामुळे त्यांची आठवण ही कायम राहिल, असे चोरगे म्हणाले. यावेळी उपस्थितांनी जगदीश चोरगे यांना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या आहेत.

# सुकेळीचा धबधबा ठरतोय आकर्षक

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील सुकेळी खिंडीच्या पायथ्यापासुन महामार्गाच्या पूर्वेला वरदायनी मंदिराच्या डोंगरावरून झाडा झुडपातून कोसळणाऱ्या नयनरम्य सुकेळीचा धबधबा पर्यटकांसाठी सुट्टीचा आनंद घेण्यासाठी आकर्षक ठरत आहे. या धबधब्याला माता वरदायनीचा धबधबा म्हणूनही ओळखले जाते. परंतु, स्थानिक लोक त्याला सुकेळीचा धबधबा म्हणूनच ओळखतात.

यावर्षी पाऊस वेळेवर सुरु झाला असुन गेल्या आठ दिवसांपासून जोरदार पावसामुळे हा धबधबा वाहू लागला आहे. त्यामुळे रविवारची सुट्टी



घळविण्यासाठी मुंबई, पुणे, ठाणे तसेच स्थानिक निसर्गप्रेमींना या धबधब्याची वर्षासहलींसाठी पार्वणीच ठरत आहे.

सुकेळी धबधब्यापर्यंत जाण्यासाठी मुंबई-गोवा महामर्गावरून सुकेळी खिंडीच्या पायथ्याजवळून खैरवाडी फाट्यावरून साधारणपणे ३० मिनिटे पायपीट करावी लागते. परंतु, निसर्गरम्य व डोंगराच्या कुशीत असणाऱ्या माता वरदायनीच्या मंदिराजवळून जाताना १०० ते १५० फुट उंचावरून पडणारे हे पाणी पर्यटकांसाठी आकर्षक ठरत आहे. यामुळे दरवर्षी हजारोंच्या संख्येने पर्यटक येथे वर्षासहलींचा आनंद घेण्यासाठी येत असतात.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

४ जुलै

१) श्री.भालचंद्र लक्ष्मण म्हात्रे
०४-०७-१९३८, अलिबाग
२) श्री. महादेव वामन पाटील
०४-०७-१९४६, बोरिस, अलिबाग
३) श्रीम.शर्मिला शशिकांत कोलते
०४-०७-१९४६ वरसोली, अलिबाग


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयातदाखलअसलेल्यारुग्णांच्याएकानातेवाईकालाजेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


# नेरळ परिसरातील गावे अंधारात

## ग्रामस्थ धडकले महावितरण कार्यालयावर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**नेरळ परिसरातील दामतजवळ रविवारी रात्री आलेल्या वादळी वाऱ्यामुळे विजेच्या खांबावरील वीज वाहिन्या रस्त्यावर पडल्या. त्यामुळे त्या वाहिनीवर अवलंबून असलेली चार गावे अंधारात गेली आहेत. दरम्यान, वीज पुरवठा सातत्याने खंडित होत असल्याने शेलू गावातील तरुण मंडळींनी थेट नेरळ येथील महावितरण कार्यालय गाठले होते. मात्र, नेरळ येथील कार्यालयाला चक्क कुलूप असल्याने वीज ग्राहक आणखी संतप्त झाले होते.**



नेरळ येथील वीज उप केंद्रातून शेलू गावाकडे वीज जाते, त्याचवेळी शेलू भागातून ही वीज वाहिनी बांधीवली आणि उल्हास नदीच्या पलीकडे असलेल्या बिरदोले गावाकडे जात असून कर्जत-कल्याण राज्यमार्गावरील दामतपासून शेलू भागात रविवारी रात्री सुरू असलेल्या वादळीवाऱ्याने अनेक वीज वाहिन्या तुटून जमिनीवर पडल्या आहेत. ही मुख्य वीज वाहिनी असल्याने दामत, शेलू, बांधीवली आणि बिरदोले येथील वीज पुरवठा खंडित झाला आहे. त्यानंतर दोन दिवस या चारही गावात कमी दाबाने वीज पुरवठा तसेच वीज पुरवठा सातत्याने खंडित होण्याचे प्रकार सुरू होते. या सर्व प्रकाराने या चारही गावातील ग्रामस्थांची झोप उडून गेली होती. त्यात स्थानिक वीज ग्राहकांनी महावितरण कार्यालयात संपर्क साधला असता येथील कर्मचारी सहाकार्य करत नाहीत. तर, येथील सहायक अभियंता प्रशांत मोडक आजारी असल्याने त्यांच्या जागी प्रभारी म्हणून नियुक्त केलेले अभियंता कुंटे हे देखील वीज ग्राहकांच्या तक्रारींना सामोरे जात नव्हते. शेवटी मंगळवारी (दि.२) शेलू गावातील नागरीक नेरळ येथील महावितरण कार्यालयावर धडकले. परंतु, त्यावेळी महावितरण कार्यालयात कोणीही कर्मचारी उपलब्ध नव्हता. त्यामुळे विज ग्राहक आणखी संतप्त झाले होते.

यावेळी कृष्णा बोराडे, अक्षय हिसाळगे, महेश खारीक, रवी मसने, मनोहर मसने, जयराम मसने, दिलीप मसने, संदेश बागडे, मनोज तरे, प्रकाश भगत, विलास मसने, सिद्धी हिरेमठ, अनंता मसने, श्रीकांत मसने, सतीश खारीक, हर्षल मसने, निलेश मसने, मनीष तरे, दयानंद खांडपेकर हे वीजधारक उपस्थित होते.

> महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता काम होईल असे सांगण्यात आले. परंतु, दोन दिवस कोणत्याही प्रकारचे काम आम्हाला दिसून आले नाही. ही परिस्थिती अशीच चालू राहिली तर यापुढे शेलु गावातील सर्व वीजधारक महावितरणच्या विरुद्ध उपोषणाला बसतील.
>
> -संदेश बागडे, ग्रामस्थ

# सुतारवाडीत शेत मजुरांचा तुटवडा

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

गेल्या काही दिवसांपासून पावसाने जोर धरला असून सुतारवाडीसह अन्य परिसरांमध्ये भात लावणीच्या कामांना वेग आला आहे. परंतु, यावर्षी देखील शेतीच्या कामासाठी शेत मजुरांचा मोठा तुटवडा भासत आहे.

यावर्षी पाऊस वेळेत सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांनी यावेळी जून महिन्यातच नांगरणीची कामे उरकून पेरणी केली होती. जुलै महिन्यात पाऊस नियमितपणे पडत असल्यामुळे शेतकरी वर्गाने वेळेत लावणी व्हावी यासाठी जोर धरला आहे. परंतु, नांगरणीच्या कामासाठी दिवस ५०० रु. मजुरी देऊन सुद्धा नांगऱ्या मिळत नाही. यातच आता गुरांचे प्रमाणही कमी झाले असल्यामुळे नांगरणीसाठी बैलांची कमतरता जाणवत होती. तसेच, या परिसरात मोठ्या प्रमाणावर फार्म हाऊस आणि रोपवाटिका फार्म असल्यामुळे शेत मजुरी करणारे त्या ठिकाणी कायमस्वरूपी मोलमजुरीसाठी जात असल्यामुळे स्थानिक विभागांमध्ये मजुरांचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा भासत आहे.



## विद्युत खांब धोकादायक

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

शहराचे डम्पिंग ग्राउंड हे टेंबी वसाहत जवळ असून येथील रस्त्यावर असलेला एक विद्युत खांब धोकादायक झाला आहे. तो खाली गंजून जीर्ण होऊन वाकला आहे. परिणामी वारा पावसामध्ये तो कधीही कोसळण्याची शक्यता असून मोठी दुर्घटना होऊ शकते. हा रस्ता शिळोशी व मढाळी गावांना देखील जोडतो. त्यामुळे येथून मोठ्या प्रमाणात रहदारी सुरू असते. अशावेळी हा विद्युत खांब कोसळल्यास अपघात घडू शकतो. त्यामुळे हा विद्युत खांब लागलीच दुरुस्त करावा किंवा या जागी दुसरा खांब बसवण्यात यावा, अशी मागणी येथील स्थानिक नागरिकांनी केली आहे. याशिवाय नगरपंचायतचे सफाई कर्मचारी या ठिकाणी नियमित कचरा टाकण्यासाठी येतात. त्यांनाही या खांबापासून धोका आहे.

## एक हजार शैक्षणिक साहित्य वाटप




**। खांब । वार्ताहर ।**

साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट व नाईटिंगल चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्यावतीने रोहा तालुक्यातील विविध माध्यमिक व प्राथमिक शाळेतील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.

गेल्या दहा वर्षांची परंपरा राखत साई फाऊंडेशन व नाईटिंगल चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्यावतीने स्व. शिवरामकृष्णन अय्यर यांच्या स्मरणार्थ व डॉ.असिफ कासकर यांच्या विशेष प्रयत्नांतून तालुक्यातील खांब, चिल्हे, विठ्ठलवाडी, तळाघर येथील माध्यमिक विद्यालय व तळवली, नडवली, चिल्हे, धानकान्हे, देवकान्हे, उडदवणे, मुठवली खु. गावठाण, तारेघर, खारी, देवकान्हे डोंगर वाडी आदी प्राथमिक शाळेतील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. असिफ कासकर, डॉ. गौतम त्रेहन, अमित चौधरी, संदीप विचारे, कविता पाटील, अश्विनी विचारे, संदेश गमरे, विनोद पाटील, तौसिफ येरूणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## रामनाथ गायकवाड यांचे निधन

**। उरण । वार्ताहर ।**

उरण येथील ज्येष्ठ स्वातंत्र सैनिक रामनाथ सखाराम गायकवाड (९२) यांचे मंगळवारी (दि.२) वृध्दापकाळाने निधन झाले आहे. गोवा मुक्ती स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्या गायकवाड यांना अटकेची शिक्षाही झाली होती. यांच्या अंत्ययात्रेत स्वातंत्र्य प्रेमी नागरिक, मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कोटनाका येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.



# पोयनाड येथे आरोग्य शिबीर संपन्न

**। भाकरवड । वार्ताहर ।**

अलिबाग मुरुड मेडीकल असोसिएशनच्या अध्यक्षा सुनिता मकरंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि मेडिकल असोसिएशन ऑफ पोयनाड यांच्या सहकार्याने 'डॉक्टर्स डे'च्या निमित्ताने विद्यार्थी मार्गदर्शन, पौष्टिक खाऊ वाटप व विनामूल्य दंत तपासणी शिबिराचे आयोजन सोमवारी (दि.१) रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोयनाड येथे आयोजित करण्यात आले होते.



यावेळी डॉ. मकरंद विष्णू पाटील, डॉ. विष्णू म्हात्रे, डॉ. ओंकार पाटील, डॉ. भक्ती ओंकार पाटील, डॉ. तक्षशिला चौबळ, डॉ. रेखा म्हात्रे, डॉ. प्रशांत बैकर, डॉ. सुनिता बैकर आदी उपस्थित होते. तसेच, डॉ. सुनिता मकरंद पाटील यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. डॉ. तक्षशिला चौबळ यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांची दंत तपासणी करून योग्य सल्ला दिला. तसेच, उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना टूथ ब्रश व टूथ पेस्ट वाटप करण्यात आले. तर, राज्य कृषी दिनाचे औचित्य साधून शाळेला जांभाचे फळ झाड भेट स्वरूपात देण्यात आले.



**■ पेण तालुक्यातून आदिवासी महिला रान भाज्या पनवेलच्या भाजी बाजारात विक्रीसाठी आणत असून यातील कंटोली, शेवळे, भारंगी, टाकळा या रानभाज्यांच्या खरेदीसाठी ग्राहक अधिक पसंती देत आहेत.**

# रानभाज्यांची आवक वाढली

**। रोहा । वार्ताहर ।**

पावसाळ्यात डोंगरमाथ्यावर तयार होणाऱ्या रानभाज्यांची आवक कोलाडमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढली असून या भाज्यांना खवय्यांची चांगली पसंती मिळत आहे.



आयुर्वेदिकदृष्ट्या या भाज्या अत्यंत लाभदायक ठरत असल्याने या भाज्यांची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे आदिवासी भगिनींना आपल्या हक्काचे उत्पन्नाचे साधन प्राप्त झाले आहे. रानभाज्या संधीवात, मधूमेह व पोटाचे विकारांवर लाभदायक ठरत असल्याचे मत आयुर्वेद तज्ञांचे आहे. या भाज्या पावसाच्या आगमनाबरोबर लगेचच जमिनीवर नैसर्गिक पद्धतीने उगवत असल्याने यांचे सेवन केल्याने कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम होत नाहीत. यात टाकळा, भारंगा, कुडा, शेवळा, अळूची पाने व भोवतीची पाने, करटोळी आदी रानभाज्या सध्या विक्रीसाठी आणल्या जात आहेत.

येथील विक्रेता महिलेने सांगितले की, बेसुमार होत चाललेली जंगलतोड, जंगलात लावले जाणारे वणवे यामुळे रानभाज्या शोधण्यासाठी खुप वेळ जातो. घरची मुले व पुरुष रानोमाळ भटकून रानभाज्या गोळा करत असून आम्ही महिला बाजारात त्यांची विक्री करण्यासाठी घेऊन येत असतो.

## जनजागृती फेरी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

आंतरराष्ट्रीय प्लॅस्टिक बॅग मुक्त दिन म्हणून ३ जुलै हा दिवस पाळला जातो. या दिवशी हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्यामंदीर मुरुडतर्फे मुख्याध्यापिका प्रविता गार्डी यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य जनजागृती फेरी मुरुड शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली होती. या फेरीत १९० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. प्लॅस्टिक हटवा, पर्यावरण वाचवा, प्लॅस्टिकचा वापर टाळा, पृथ्वी वाचवा, असा संदेश देणारे फलक मिरवित घोषणा देत विद्यार्थ्यांनी शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले.

## पेण शाखेच्यावतीने वृक्षारोपण




**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या प्रबंधक कार्यालयाच्यावतीने बँक दिवसाचे औचित्य साधून पेण येथील वन कार्यालय निवास स्थानाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपणाला नवीन मिश्रा, राघवेंद्रकुमार, विलास शिंदे, असलोक कुमार, पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, कुलदीप पाटकर, पालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील, अभियंता रमेश देशमुख, रविकांत ठाकूर, राजेंद्र हटकर आदी उपस्थित होते.

# मोकाट फिरणाऱ्या जनावरांना जीवदान

**। रसायनी । वार्ताहर ।**

विश्व हिंदु परिषद आणि बजरंग दल यांच्या संयुक्त विद्यमाने साकारलेले रसायनी पाताळगंगा येथील बजरंगी मित्र मंडळाचे गोमाता संरक्षक मलेश गुडसे यांच्या सहकार्यातून बजरंगी बांधव परिसरातील गोमातांच्या आरोग्याची काळजी घेताना दिसत आहेत. परिसरातील गोमांताना कोणतीही इजा झाल्यास हे बजरंगी बांधव एकत्रित येत पशुवैद्यकिय डॉक्टरांशी संपर्क साधून गोमातेचे संरक्षण करताना परिसरात दिसत आहेत. यावेळी रसायनी परिसरातील काही गाईंची



नखे व शींगे वाढली आहेत, त्यांना चालताना खुप त्रास होत आहे, अशी माहिती बजरंगी बांधवांजवळ अनेकांनी बोलून दाखविली होती. मोहोपाडा येथील परिसरात एका गाईचे शिंग वक्र असल्याने ती गाय चालताना तिच्या डोक्याला शिंग लागत असल्याने ही गाय जखमी होऊन त्यातून कित्येक दिवस रक्तस्राव सुरू होता. याची दखल घेत बजरंगी बांधवांनी त्या गाईच्या शिंगाचा वक्र भाग कापून काढला आणि जखमेवर औषधोपचार केले. बजरंग दलाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी गोरक्षक प्रमुख मलेश गुडसे, अध्यक्ष जनार्दन मालुसरे, संयोजक प्रशांत तांबोळी, गोरक्षक प्रमुख राजा जांभुळकर, सहसयोजक दिनेश पडवळ, नामदेव केदारी, संदीप तांबोळी, सुभाष खुडे, सुभोद मिश्रा आदी उपस्थित होते.

## बोर्लीपंचतन येथे संयुक्त उपक्रम

**। बोर्ली पंचतन । वार्ताहर ।**

बोर्ली पंचतन वन विभाग आणि ग्रुप ग्रामपंचायत बोर्ली पंचतन यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत येथील हिंदू स्मशानभूमीत बुधवारी (दि.३) वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून आईचा सन्मान तर करूच, पण पृथ्वीमातेचे रक्षणही करु, हे लक्षात घेऊन जागतिक पर्यावरण दिनानिमित्त केंद्र शासनाच्यावतीने ही विशेष मोहीम सुरु केली आली आहे.

# गजानन भोईर यांचे उपोषण मागे

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील आपल्या विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते गजानन भोईर यांनी पेण येथील खारभूमी खात्याच्या कार्यालयासमोर सुरु केलेले उपोषण लेखी दिलेल्या पत्रानंतर मागे घेण्यात आले आहे.



कोलेटी, आमटेम भागातील खारभूमी योजनेच्या कामाबद्दल ग्रामस्थ सतत तक्रारी करत आहेत. त्यात अनेक त्रुटी असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मात्र, त्याकडे अधिकाऱ्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला जात आहे. त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे गजानन भोईर हे दि.१८ जून रोजी आमरण उपोषणास बसणार होते. परंतु, तहसीलदार तानाजी शेजवळ यांनी त्यांना उपोषणास न बसण्याची विनंती केली होती. त्यांच्या विनंतीला मान देऊन गजानन भोईर यांनी आपलं आमरण उपोषण स्थगीत केले होते. मात्र, २० दिवस होऊन देखील याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे भोईर व ग्रामस्थांनी पेण येथील खारभूमी खात्याच्या कार्यालयासमोर उपोषण सुरु केल होते.

यावेळी अरुण शिवकर, नंदा म्हात्रे, प्रशांत म्हात्रे, अभि म्हात्रे तसेच उपोषण करते गजानन भोईर व उपअभियंता अतुल भोईर यांच्यात यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. या चर्चेत ग्रामस्थांच्या मागण्यांचा विचार करून येत्या ५ जुलै रोजी एक संयुक्त बैठक घेतली जाईल. या बैठकीत सर्व प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील असे उपअभियंता अतुल भोईर यांनी सांगत गजानन भोईर यांनी आपले उपोषण तूर्तास मागे घ्यावे, अशी विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देत गजानन भोई यांनी आपले उपोषण मागे घेतले आहे.

# आषाणे धबधबा ठरतोय गर्दीचे केंद्र

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील भिवपुरी रोड रेल्वे स्थानकाजवळ असलेला आषाणे येथील धबधबा पावसाळ्यातील आकर्षण बनला आहे. हा धबधबा पावसाळ्यातील चार महिने लाखोच्या संख्येने पर्यटकांना आपल्याकडे खेचून घेत असतो. यामुळे धबधबा अनेकांचे उदरनिर्वाहाचे साधन बनला आहे.**



कर्जत-कल्याण राज्यमार्गावर आषाणे गावाच्या मागील बाजुस असलेल्या डोंगरावरून उडणारे पावसाचे तुषार खाली ४० फुटावर झेलण्यासाठी पर्यटक वर्षासहलीच्या निमित्ताने येथे येत असतात. येथे आलेल्या पर्यटकांचे पाय उमरोली गावातून धबधब्याकडे वळतात. मात्र, त्या रस्त्याने जाताना एक लहान ओढा असून तो पार करताना गतवर्षी एका चिमुरडीसह दोघांचा बळी गेला होता. मात्र, याच रस्त्याने बहुतेक पर्यटक धबधबा परिसरात पोहचत असतात.

या धबधब्याचे वैशिष्ट्य म्हणजे धबधब्याचा डोह जेथे आहे तेथून तब्बल दीड कि.मी. पर्यंत पाणी वाहून नेणाऱ्या ओढ्यात बसून पर्यटक पाण्याच्या आनंद घेऊ शकतात.

मात्र, धबधब्याच्या मुख्य डोहातपावसाचेपाणीप्रचंडप्रमाणात कोसळत असल्याने पाण्यासोबत अनेकदा दगड वाहून येतात. हे दगड पाण्याच्या प्रवाहाखाली असलेल्या पर्यटकांच्या डोक्यात पडून अपघात होण्याची शक्यता आहे. अन्य कुठेही या धबधब्यावर धोका नसल्याने पर्यटक वर्षा सहलीचा आनंद घेण्यासाठी येत असतात.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



**। पाली । वार्ताहर ।**

दहावी, बारावी परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा सुधागड तालुका मराठा समाजाच्यावतीने रविवारी पाली येथील मराठा समाज भवन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमासाठी धनंजय साजेकर, साधुराम बांगारे, विठ्ठल घाडगे, दत्ताराम पोंगडे, यशवंत कदम, गणपत सितापराव आदींसह मोठ्या संख्येने सर्व समाज बंधू-भगिन, युवक, विद्यार्थी यांची उपस्थिती होती. यावेळी तालुक्यात प्रथम ३ क्रमांक प्राप्त केलेल्या दहावी व बारावी गुणवंतांना सन्मानचिन्ह, धनादेश, झाडे, भेटवस्तू, गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, इतर गुणवंत विद्यार्थ्यांना भेटवस्तू व झाडे देऊन सन्मानित करण्यात आले.

निवडक

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पाली/गोमाशी :** सुधागड तालुका मराठा समाजाच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२४ मध्ये १० वी, १२ वी परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मराठा समाज भवन पाली येथील स्व.स.स.साजेकर सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी मराठा समाजाचे अध्यक्ष धनंजय साजेकर हे होते. प्रमुख अतिथी सुधागड तालुका गटशिक्षण अधिकारी साधुराम बांगारे, सु.ता.र. सेवा संघ ठाणेचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे, मुंबईचे अध्यक्ष दत्ताराम पोंगड उपस्थित होते.

## समुद्र किनारा केला स्वच्छ

**मुरुड जंजिरा :** ३ जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय प्लास्टिक बॅग मुक्त दिन म्हणून पाळला जातो. या दिनाचे औचित्य साधून मुरुड शहरातील समुद्र किनारी क्रिकेट खेळावयास येणारी मुरुड, मजगाव, नांदगाव येथील सर्व क्रिकेटपट्टूंनी समुद्र किनाऱ्यावर स्वच्छता अभियान राबवले. रोज सकाळी क्रिकेट खेळावयास येणाऱ्या सर्व खेळाडूंनी एकत्र येऊन ही स्वछता मोहीम राबवल्याने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. समुद्र किनारी असणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या यासह अन्य कचरा गोळा करण्यात आला.

## एआयएमआयएमचे होमहवन

**पेण :** गेली १४ वर्षे रखडलेल्या मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पूर्णत्वास येत नसल्यामुळे अनेक संघटना आक्रमक झाल्या आहेत. २८ जुलै रोजी एआयएमआयएमच्यावतीने माणगाव येथे होमहवन करण्यात येणार असल्याची माहिती एआयएमआयएमचे कोकण निरीक्षक हाजी शाहनवाज खान यांनी दिली. सध्या या महामार्गाची पुरती दुरवस्था झाली आहे. १२ वर्ष झाले तरी काम अद्याप पूर्ण झालेले नाही. सरकार याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आहे.

## मायणी शाळेत वृक्षारोपण

**खरोशी :** शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक जाणीव जागृती व्हावी यासाठी इको क्लब फॉर मिशन लाईफ या थीमवर आधारित प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण पूरक शैक्षणिक उपक्रम शासनाच्यावतीने घेतले जातात. त्याचाच एक भाग म्हणून रायगड जिल्हा परिषद शाळा मायणी तालुका पेण या शाळेत नुकतेच विद्यार्थी व पालकांच्या सहभागाने वृक्षारोपण करण्यात आले. लावलेल्या झाडांच्या संगोपनाची जबाबदारी यावेळी प्रत्येक वर्गावर देण्यात आली.

## वीज समस्या कायम

**शिहू बेणसे :** शिहू बेणसे विभागात वीजेचा खेळखंडोबा सुरूच असून वीजपुरवठा सतत खंडीत होत असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. नुकतेच महावितरनकडे नागरिकांच्यावतीने निवेदन देण्यात आले होते. परंतु, वीज समस्या जैसे थे आहे. वीज बिलाच्या वसुलीसाठी इशारा देणाऱ्या महावितरणवर वीजपुरवठा सुरळीत करण्याची जबाबदारी नाही का? असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. वीजेचा लपंडाव बंद करावा, अशी मागणी आहे.

# आपत्ती व्यवस्थापनात ‘ड्रोन’ प्रभावी

### रायगड पोलिसांकडे सक्षम यंत्रणा ; वाहतूक कोंडी, शिवराज्याभिषेक सोहळ्यासह बचाव मोहिमांवर नजर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड हा सर्वाधिक आपत्तीप्रवण जिल्हा आहे. आपत्ती व्यवस्थापनात वेगवेगळे पर्याय निवडताना रायगड पोलिस दलाकडून ड्रोनचा प्रभावीपणे वापर केला जात आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडी, शिवराज्यभिषेक दिन सोहळ्यानिमित्ताने किल्ले रायगडवर होणारी शिवप्रेमींची गर्दी याबरोबर दऱ्या खोऱ्यात अडकणाऱ्यांपर्यंत पोहचण्यात ड्रोनचा प्रभावीपणे वापर करण्यात रायगड पोलिसांना यश येत आहे. रायगड पोलिस दलात सद्यः स्थितीत दोन चांगल्या क्षमतेचे ड्रोन आहेत. ही क्षमता वाढविण्यासाठी जिल्हा नियोजनमधून आणखी एक ड्रोन घेतला जाणार आहे. यासाठी जिल्हा नियोजनकडून १५ लाखांचा निधी खर्च केला जाणार आहे.

जिल्ह्यातपावसाळ्यातघडणाऱ्या आपत्तींचे प्रमाण सर्वाधिक आहे. यात दरडी कोसळणे, धबधब्यामध्ये पर्यटकांचा बुडून मृत्यू, नदीमध्ये वाहून जाणे याचबरोबर पुरामध्ये अडकलेल्या व्यक्तींची स्थिती जाणून घेण्यासाठी रायगड पोलिस दलाकडून ड्रोनचा अधिक सक्षमपणे केला जात असल्याचे दिसून येत आहे. ज्या ठिकाणी बचाव पथकाला पोहचता येत नाही, त्या कड्याकपारीच्या जवळ जाऊन ड्रोन कॅमेऱ्याने पाहणी करून वस्तुस्थितीचा आढावा काही मिनिटांमध्येच घेता येतो. यात जोखीम कमी असल्याने रायगड पोलिसांकडून अशा प्रकारच्या ड्रोनचा वापर केला जात आहे.

> ड्रोन हा बचावपथकातील अविभाज्य भाग होत आहे. येथील दुर्गम भागात तर ते गरजेचे आहे. डोंगर, कड्याकपारीत शोधकार्य राबवण्यातही ड्रोनचा वापर होत आहे. त्याचबरोबर दुर्गम भागात घडलेल्या दुर्घटनेची वस्तुस्थिती समजावी यासाठी ड्रोनची क्षमता वाढवली जात आहे.
> – अतुल झेंडे, अपर पोलिस अधीक्षक, रायगड.



### किल्ले रायगडवरील गर्दीवर नजर

किल्ले रायगडची पायवाट अवघड असून शिवप्रेमींच्या सुरक्षेसाठी रायगड पोलिस ड्रोनचा चांगल्या प्रकारे वापर करीत आहेत. याचे कौतुक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही केलेले आहे. शिवराज्याभिषेक दिनसोहळ्याच्या दिवशी रायगडवर मोठ्या संख्येने शिवप्रेमी येतात. या गर्दीवर नजर ठेवण्यासाठी मनुष्यबळ कुचकामी ठरते, परंतु ड्रोनद्वारे सर्व बाजूने लक्ष ठेवता येते. धोक्याच्या ठिकाणी जाणाऱ्या लोकांना योग्य सल्ला दिला जातो. गतवर्षी ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनी झालेली कोंडी फोडण्यात रायगड पोलिसांना काही क्षणातच यश आले होते.

### वाहून गेलेल्या व्यक्तीचा यशस्वी शोध

२७ जून रोजी देवकुंड धबधब्यात वाहून गेलेल्या व्यक्तीचा शोध लागत नव्हता. देवकुंड धबधब्यात उतरणे अधिक धोकादायक असल्याने बचाव पथकाकडूनही जोखीम पत्करली जात नव्हती, अखेर शोध मोहिमेसाठी ड्रोनचा वापर केला. या ड्रोन कॅमेऱ्याने धबधब्याच्या खालील भागात अडकलेल्या मृतदेहाचे ठिकाण, त्याची स्थिती आणि तिथपर्यंत जाण्याचा मार्ग बचावपथकांच्या सदस्यांना काढता आला. माथेरानमध्ये अडकलेल्या व्यक्तींच्या शोधमोहिमांमध्येही यापूर्वी ड्रोनचा वापर झाला आहे.

### महामार्गावरील कोंडी सोडवण्यात यश

गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या वाहनांमुळे मुंबई–गोवा महामार्गावर नेहमी वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडीच्या ठिकाणी पोलिस तैनात असतीलच असे नाही. रस्त्याच्या बाजूला चिखल आणि रस्त्यातील खड्ड्यांमध्ये अडकलेल्या वाहनांमुळे मार्ग काढण्यात पोलिसांना अडचणी येतात. मात्र, त्याच वेळेस ड्रोनच्या साह्याने काही मिनिटांतच वाहतूक कोंडी झालेल्या ठिकाणचे छायाचित्र नियंत्रण कक्षात पाठवता येतात आणि कोंडी फोडण्यासाठी नियंत्रण कक्षातून ध्वनीक्षेपाच्या माध्यमातून योग्य सूचना दिल्या जातात. हा प्रयोग गतवर्षी जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी यशस्वी केला होता.

## दूंद्रे विभागातील विजेचा प्रश्न मार्गी लावा, नागरिकांची मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

दूंद्रे विभागात विजेचा प्रश्न कायम सतावत आहे. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरपंच सुभाष भोपी, उपसरपंच शितल भोपी व ग्रामपंचायत सदस्य यांनी पुढाकार घेतला आहे. या संदर्भात महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत ग्रामपंचायतमध्ये बैठक लावण्यात आली होती. यावेळी विजेचा प्रश्न लवकरच सोडवण्यात येईल, असे आश्वासन महावितरणकडून देण्यात आले.

पावसाळा नुकताच सुरू झाला आहे. मात्र दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होत आहे. त्याचा नाहक त्रास येथे राहणाऱ्या नागरिकांना सहन करावा लागतो. नेरे, दुन्द्रे, मोरबे परिसरात वारंवार वीज गायब होते. वीज नसल्यामुळे छोट्या-मोठ्या व्यवसायावर परिणाम होतो. तसेच सततच्या वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे अनेक घरातील विद्युत उपकरणे खराब होत आहेत. या संदर्भात नागरिक आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. याच तक्रारीच्या अनुषंगाने महावितरणचे अधिकारी यांची दुन्द्रे ग्रामपंचायत कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी अनेकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसमोर तक्रारींचा पाढा वाचला. तसेच शिवणसई, आंबे, आंबेवाडीतील जीर्णविद्युत खांब बदलण्याची मागणी केली. येथील अनेक विजेचे खांब खाली वाकले आहेत.

यावेळी महावितरणचे अधिकारी यांनी लवकरात लवकर विजेचे खांब बदलले जातील आणि वीजपुरवठा सुरळीत केला जाईल, असे आश्वासन दिले. यावेळी ग्रामसेवक सरडे, विश्वास पुंडलिक पाटील ग्रामपंचायत सदस्य, महेश महादू पाटील सदस्य, शांताराम चौधरी सदस्य, राणी विलास सिणारे सदस्य, सुप्रिया करमेलकर सदस्य, कैलास भोपी, गौरव चौधरी व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# दाखले मिळवण्यासाठी हेलपाटे

**। पनवेल । वार्ताहर ।**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १ जुलैपासून अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. ३१ ऑगस्ट ही अंतिम तारीख आहे. या अर्जा सोबत उत्पन्नाचा दाखला आणि रहिवाशी दाखला जोडावा लागणार आहे. मात्र हे दाखले मिळवण्यासाठीच १५ ते २० दिवसांचा कालावधी लागत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १ जुलैपासून अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. योजनेचा लाभ मिळवण्यासाठी अर्ज भरण्यासाठी महिलांची मोठी गर्दी पनवेल तहसीलदार कार्यालयात होत आहे. तात्पुरत्या यादीवर तक्रार,



हरकती दाखल करता येणार आहेत. अंतिम यादी प्रकाशित करून योजनेचा १ हजार ५०० रुपयांचा पहिला हप्ता लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा होईल.

दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत या योजनेचा लाभ महिलांच्या खात्यात जमा केला जाणार आहे. मात्र या योजनेचा लाभ मिळवण्यास पात्र ठरण्यासाठी संबंधित महिला महाराष्ट्राची रहिवासी असणे आवश्यक आहे. वयाची किमान २१ वर्षे तर कमाल ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत संबंधित महिलेला योजनेचा लाभ मिळणार आहे. सदर लाभार्थ्यांचे बँक खाते असणे बंधनकारक आहे. लाभार्थी कुटुंबाचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त नसावे ही अट असून त्या मुळे रहिवाशी दाखला आणि उत्पन्नाचा दाखला लागत आहे. मात्र ही कागदपत्रे मिळवण्यासाठीच पंधरा ते वीस दिवसांचा कालावधी लागत आहे.

### दलालांच चांगभलं

दाखले मिळण्यासाठी होत असलेल्या विलंबामुळे दलालांच चांगभलं होण्याची शक्यता आहे. दाखले लवकर मिळवून देतो सांगून महिलांकडून दलाल जादा पैसे उकलण्याची शक्यता आहे.

### महिला विवाहित असणे आवश्यक

या योजनेचा लाभ फक्त २० वर्षा वरील विवाहित महिलांनाच होणार आहे. या करता विवाहाचा दाखला अर्जा सोबत जोडणे बंधनकारक आहे. मात्र तालुक्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या महिला, आदिवासी महिला तसेच ५० वर्षावरील बऱ्याचश्या महिलांकडे विवाह नोंदणी दाखलेच नाहीत आणि हे दाखले नव्याने मिळवण्यासाठीची प्रक्रिया देखील लांबलचक असल्याने ही योजना फक्त निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन आणलीय का असा सवाल आदिवासी समाज सेविका उषा गणपत वारगडा यांनी उपस्थित केला आहे.

## आद्य नाईक याचे निधन

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील सारळ येथील अलिबाग तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे(अजित पवार गट)नेते अमित नाईक यांचा मोठा मुलगा आद्य अमित नाईक (वय १८) याचे मुंबई येथील हिंदुजा रुग्णालयात अल्पशा आजाराने सोमवारी (दि.१) दुपारच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून नाईक कुटुंबाचे सांत्वन केले. तसेच आद्य अमित नाईक याना साश्रुनयनांनी निरोप दिला. त्याच्यावर सारळ येथील स्मशानभूमीत रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याचा दशक्रिया विधी १० जुलै रोजी सारळ स्मशानभूमीत होणार आहे.



## शासनाच्या योजनेतून उत्पादनावर प्रक्रिया करून नफा कमवा - तंत्र अधिकारी तनुजा घाडगे

**। रसायनी । वार्ताहर।**

विविध योजनांचा लाभ घेऊन उत्पादन केलेल्या पिकावर प्रक्रिया करून नफा कमवा, असे आवाहन विभागीय तंत्र अधिकारी तनुजा घाडगे यांनी केले.

खालापूर तालुका कृषी विभाग आणि पंचायत समिती खालापूर यांच्या संयुक्त विद्यमाने १ जुलै हा दिवस कृषी दिन मोठ्या उत्साहात पंचायत समितीच्या सभागृहात साजरा करण्यात आला. त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन त्या बोलत होत्या. राज्यातील हरित क्रांतीचे जनक व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या स्मृतीदिनानिमित्त कृषी दिन साजरा करण्यात येतो. असेहि त्यांनी सांगितले. भारत देश हा कृषीप्रधान आहे. जगाच्या हरित



क्रांती शर्यतीत टिकून राहण्यासाठी शेतीला तंत्रज्ञानाची जोड देणंही गरजेचं आहे. जगाच्या हरित क्रांती शर्यतीत टिकून राहण्यासाठी शेतीला तंत्रज्ञानाची जोड देणंही गरजेचं आहे. त्यामुळे सर्व शेतकरी बांधव यांनी शेतीचे अधिक उत्पादन घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन कृषी अधिकारी नारायण गोसावी यांनी केले. वसंतराव नाईक यांना कृषी विभाग, पंचायत समिती आणि उपस्थित शेतकरी यांच्यावतीने आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी गटविकास अधिकारी राजपूत, कृषी अधिकारी खाडे, अधिक्षक संजीव चोपडे, खैर, मंडळ कृषी अधिकारी नितीन महाडिक यांच्यासह कृषी कार्यालय आणि पंचायत समिती कार्यालय यांचे अधिकारी, कर्मचारी आणि तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंचायत समितीच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली.

## महाड तालुक्यात वृक्ष लागवडीपेक्षा वारेमाप वृक्षतोड

### वन खाते सुस्तावल्याने विन्हेरे विभाग झाला उजाड



**। महाड । वार्ताहर ।**

महाड तालुक्यात चालू वर्षी जानेवारी महिन्यापासूनच मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यास परवानगी दिल्याने तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाली आहे. त्यामानाने वृक्ष लागवडीकडे लक्ष देण्यास वन खात्याच्या महाड कार्यालयाला अपयश आल्याचे चित्र महाड तालुक्यात पाहण्यास मिळत आहे.

महाड तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यापासून थेट शिवथरघळपर्यंत तसेच वरंध घाट, विन्हेरे विभाग, खाडीपट्टा, वहूर, दासगाव या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जानेवारी महिन्यापासून ते मे महिन्याच्या अखेरपर्यंत मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाली आहे. महाड वन विभागाकडून वृक्षतोड करणाऱ्या ठेकेदारांना ज्या ठिकाणी वृक्षतोड करायचे आहे. तेथील परवाना दिला जातो. मात्र दिलेल्या परवानापेक्षा अधिक वृक्षतोड केली जात आहे. खाजगी जमिनीतून वृक्ष तोडून ते परवाना दिलेल्या मालकीमध्ये आणून टाकायचे व पुरावा नष्ट करायचा हा गोरखधंदा मोठ्या प्रमाणावर विन्हेरे विभागात मागील चार महिने खुलेआमपणे काही जंगल ठेकेदार करीत आहेत.

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी १३ वसतिगृहे

### प्रवेशासाठी ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज करावा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षणाचा पर्याय सुलभ होण्यावर शासनाने अधिक भर दिला आहे. रायगड जिल्ह्यातीलडोंगरदऱ्यांमध्येराहणाऱ्या आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन शिक्षण घेता यावे, यासाठी वसतिगृह उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यासाठी जिल्ह्यात तब्बल १३ वसतिगृहे सोयीसुविधांनी युक्त सज्ज झाली आहेत. या वसतिगृहांमध्येप्रवेश मिळविण्यासाठी आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज करावा लागणार आहे.

आदिवासी विकास विभागाकडुन अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता इयत्ता ८ वी पासुन पुढील शिक्षणाकरिता रायगडमध्ये पेण (मुले), कर्जत (मुले), नेरळ (मुले), पनवेल खांदा कॉलनी (मुले), पनवेल नविन (मुले), महाड (मुले), सुधागड (मुले), नागोठणे (मुले), पेण (मुली), पनवेल (मुली), नेरळ (मुली), सुधागड (मुली) व रतागिरी जिल्ह्यामध्ये रतागिरी (मुले) अशी एकुण १३ वसतिगृहे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

वसतिगृहामध्ये ऑनलाईन प्रणालीव्दारे शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करिता प्रवेश अर्ज https://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर स्वीकारण्यात येत आहेत. अर्ज भरण्याकरिता आवश्यक कागदपत्रे व इतर आवश्यक सुचना या सदर वेबसाईटवर दिलेल्या आहेत. वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन व निर्वाह भत्ता व इतर शैक्षणिक सोयी-सुविधा आदिवासी विकास विभागामार्फत उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. वसतिगृह प्रवेशासंदर्भात कोणत्याही अडचणीकरिता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण येथील वसतिगृह विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेणच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांनी केले आहे.

## पर्यटनस्थळी सूचना फलकाची गरज

**बोर्लीपंचतन :** पावसाळा सुरू झाल्यानंतर कोंढेपंचतनमधील विहिरी, तलाव, नद्या, धरण तुडुंब भरुन वाहण्यास आता सुरूवात झाली आहे. याचं सर्व पाण्याच्या स्त्रोतामधे डुंबण्याचा, पोहण्याचा आनंद बच्चे कंपनी सोबतच प्रौढ वर्ग सुध्दा घेत असतो. अप्रिय घटना टाळण्यासाठी सूचना फलक लावण्याची गरज आहे.

अतिउत्साही पर्यटक, स्थानिक मद्यपान करून या धरणामध्ये उड्या घेत असतात त्यामुळे अनेक वेळा धरणाचे पाणी दूषित होते. मात्र यावर कोणत्याही प्रकारची कठोर कारवाईचे फलक किंवा ग्रामपंचायतस्तरावरून कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई होत नाही. याबाबत नाराजीचा सूर आहे.

## रानसई आदिवासी ठाकूरवाडीत कृषीदिन साजरा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण पंचायत समितीचा कृषी विभाग आणि उरण तालुका कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीदिनी रानसईबंगल्याच्यावाडीत, आदिवासी ठाकूर बांधवांच्या उपस्थितीत कृषी दिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान उरण पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी संतोषसिंग डाबेराव यांनी भूषविले होते. या कार्यक्रमाला तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर, पशुधन विकास अधिकारी भोजने, चिरनेर ग्रा.प. ग्रामविकास अधिकारी महेश पवार, चिरनेरचे पोलीस पाटील संजय पाटील, सहाय्यक कृषी अधिकारी सुरज घरत, ग्रामीण पाणीपुरवठा अभियंता चव्हाण, कृषीच्या विस्तार अधिकारी अश्विनी जाधव, कृषी मित्र प्रफुल्ल खारपाटील, सरपंच राधा पारधी, रानसईचे ग्रामसेवक प्रमोद मुकुंदे, महेश काळे, बाळकृष्ण खारपाटील, माजी उपसरपंच अनिल केणी, आंबा बागायतदार भास्कर ठाकूर, बाळकृष्ण ठाकूर तसेच कृषी सहाय्यक व पंचायत समितीचे कर्मचारी, आदिवासी ठाकूर बांधव तसेच चिरनेर परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी रानसई बंगल्याची वाडी येथे विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली, तसेच त्यांच्या संगोपनाची जबाबदारी घेतली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- मांडवा येथे गाडीवर ड्रायव्हर पाहिजे आहे. मो. ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३ अलिबाग
- Require Fresher/Experienced Civli engineers for Alibaug Project. Email CV to projects@parthinfraalibaug.com 9922768626 https://parthinfraalibaug.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### आदिवासी महिलांना हक्काचा रोजगार

# आरोग्यवर्धक रानभाज्यांना पर्यटकांची पसंती

**। रायगड । प्रतिनिधी ।**

नैसर्गिक रानभाज्या विक्रीतून आदिवासी महिलांना हक्काचा रोजगार मिळत आहे. भातशेतीच्या कामातून वेळ काढत कुटुंबाचा रहाटगाडा हाकण्यासाठी पावसाळ्यात जंगलात उगवणारी शेवळी, करडू, कोळी भाजी, बांबूची शिन, माटभाजी, दिंडे आणि खापरासारख्या रानभाज्यांची रस्त्यालगत बसून विक्री केली जात आहे. रानभाज्यांसोबत गावरान कोंबडे, चिंबोऱ्या आणि खेकड्यांच्या विक्रीतून आदिवासी महिलांना चांगले उत्पन्न मिळत आहे.



शनिवार आणि रविवारच्या सुट्टीच्या दिवशी पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर पर्यटक रानभाज्या खरेदीसाठी गर्दी करत आहेत. पावसाळ्यात हाताला काम नसल्याने उत्पन्नाचे साधन म्हणून रानभाज्यांच्या विक्रीकडे आदिवासी महिलांचा कल दिसून येतो. पावसाळ्याला सुरुवात होताच जंगलात रानभाज्या उगवण्यास सुरुवात होते. रानभाज्यांबाबत उत्तम ज्ञान असलेले आदिवासी बांधव जंगलातून रानभाज्या शोधून आणतात. त्यानंतर त्या रस्त्यालगत आपापली तात्पुरती दुकाने जमिनीवर थाटून त्यांची विक्री करतात. पर्यटक आणि शहरी ग्राहकांकडून रानभाज्यांना विशेष पसंती मिळत आहे.



### रानभाज्यांचे दर

| | |
|---|---|
| कोली भाजी | १५ रुपये जुडी |
| करडू | १५ रुपये जुडी |
| शेवली | २५ रुपये जुडी |
| दिंडे | १५ रुपये जुडी |
| खापरा | १५ रुपये जुडी |
| शिन | २० रुपये वाटा |
| करवंद | १० रुपये वाटा |
| टाकळा | १० रुपये जुडी |

# शिष्यवृत्ती परीक्षेत आदेश खेडकर रायगड जिल्ह्यात पहिला

**। खरोशी । प्रतिनिधी।**

फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत पेण शिक्षण महिला समितीच्या श्रीमती सुमतीबाई वि. देव विद्यालयातील आदेश अंबादास खेडकर या विद्यार्थ्याने जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच्यावर पेणसह हा रायगड जिल्ह्यातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. विद्यालयाच्या एकूण ८ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवली आहे.

शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता ५ वी मधील जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत ७ व्या क्रमांकावर हर्षिता तुकाराम बर्गे, ५० व्या क्रमांकावर गौतम अनिल वळवी, ६६ व्या क्रमांकावर वेदांत पंडित गांगोडे, १३७ व्या क्रमांकावर चैतन्य भूपेंद्र वारगे तसेच इयत्ता ८ वी मध्ये ३९ व्या क्रमांकावर ओजस रमेश दारकुंडे, ६६ व्या क्रमांकावर नेहा मनोज म्हात्रे, ८२ व्या क्रमांकावर मंजुळ राजन ठाकूर यांनी उज्वल यश प्राप्त केले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत ही या खाली दिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसूल दप्तरी नावे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे वरसे, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत...**

| मालकाचे नाव | गट नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| साहिर महंमद डबीर | १९३ | जिरायत ००-२४-५०<br>पो.ख. ००-०१-३०<br>एकूण ००-२५-८० | ५.४४ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन, चार्ज, अटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालू असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांत लेखी स्वरूपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. ०४/०७/२०२४

सही/-
**ॲड. पी.जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग,
चौथा मजला, साईनगर सोसायटी
छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ,
ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत ही या खाली दिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसूल दप्तरी नावे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे मालाठे, ता. तळा, जि. रायगड येथील मिळकत...**

| मालकाचे नाव | गट नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| प्रकाश दत्तू ठमके व इतर ८ | ४१३ | जिरायत ०-६४-००<br>पो.ख. ००-१५-००<br>एकूण ०-७९-०० | ०.२५ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन, चार्ज, अटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालू असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसात लेखी स्वरूपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. ०४/०७/२०२४
विरेन भानजी गाडा
विलेपार्ले पूर्व, मुंबई
(आमचे अशिल)

सही/-
**ॲड. पी.जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग,
चौथा मजला, साईनगर सोसायटी
छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ,
ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद जमीन मिळकतीचे मालक श्री. सचिन सुधाकर पेटकर, रा. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड यांचे ताबेकब्जातील, वहिवाटीतील व मालकी हक्कात असलेली त्यांचे कायदेशीर हक्काची जमीन मिळकत आमचे अशिल श्री. मंगेश बाळकृष्ण पाटील, रा. पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनींचे वर्णन खालीलप्रमाणे-

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| अ. क्र. | भूमापन क्र. | उपविभाग | खाते क्र. | भोगवटा वर्ग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७३ | ७ | ६५१ | १ | ०.५७.०० | ०.५२ |
| २ | ७३ | ८ | ६५१ | १ | ०.२३.०० | ०.२० |

वरील वर्णनाच्या जमिनींचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळावे.

येणेप्रमाणे नोटीस दिली.

पनवेल
दिनांक :- ०३/०७/२०२४

सही/-
**ॲड. रविकांत दामोदर तांडेल**
कार्यालय- बी/१०, माणेकनगर को.ऑप.हौ. सोसा.
महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी,
पनवेल- ४१०२०६, जि. रायगड
मो.नं. ९८१९२२४२०६

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ : कार्यकारी अभियंता, मुंबई प्रदेश किरोल रोड : विद्याविहार [ पश्चिम ] : मुंबई-400 086

Email. eemumbai@rediffmail.com Phone ०२२-२५१३६३०३

क्र.राप / काअमुं / ईनिविदा / ४४८ दिनांक: ०२/०७/२०२४

**ई–निविदा सुचना क्रमांक ०१ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता रा.प.मुंबई प्रदेश, किरोल रोड, विद्याविहार [प] मुंबई–८६ दूरध्वनी क्र. २५१३६३०३ हे सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र राज्य यांचेकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडुन ई–निविदेकरीता निविदा मागवित आहेत.

| ई-ID क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु |
|---|---|---|
| १०४७२७०_१ | रा.प. मुंबई विभागातील कुर्ला नेहरु नगर आगारातील उंचावरील पाण्याच्या टाकीचे नुतनीकरण व विशेष दुरुस्ती करणे. | १००३१०१.०० |
| १०४७२७०_२ | रा.प. ठाणे विभागातील भिवंडी बसस्थानकाचे वाहतळावरील खड्डे पेव्हर ब्लॉकने भरणे. | १३२०६३०.०० |
| १०४७२७०_३ | रा.प. रायगड विभागातील विभागीय कार्यशाळा रामवाडी येथे विशेष दुरुस्ती करणे. (टायरसाठी गोडाऊन बांधणे) | १६३०३०७.०० |
| १०४७२७०_४ | रा.प. रत्नागिरी विभागातील दापोली आगारात जुने पत्रे बदलुन नवे मेटाकुलर शिट बसविणे. | १६०७१९३.०० |

**ई–निविदेचे वेळापत्रक**

| क्र. | महामंडळाचा टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1. | निविदा डाउनलोड व विक्री करणे | ०४.०७.२०२४ | १०.०० |
| 2. | ऑनलाईन निविदा विक्री बंद करणे | २०.०७.२०२४ | १६.०० |
| 3. | तांत्रिक व वाणिज्य लिफाफा उघडणे, शक्य झाल्यास | २२.०७.२०२४ | १०.०० |

**टीप:**– 1. सर्व पात्र / इच्छुक निविदाकरांनी निविदा पत्रात डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीच्या **https://mahatenders.gov.in** वर मदत घेणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाच्या **www.msrtc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. 2. इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई– निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**कार्यकारी अभियंता**
**रा.प.मुंबई प्रदेश (कुर्ला)**

दिनांक : ३/०६/२०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीन मिळकत संदर्भित जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. आनंद जयंत मोरे यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी अशिल व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत.

संदर्भित जमीन मिळकतीचे परिशिष्टे

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| सासवणे ता. अलिबाग जि. रायगड | ५२९ | ०-००-५० | ०.१० |

वरील वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, मृत्यूपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. विहीत मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीन मिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**ॲड. जयेश एम. पाटील**
मु. आगरसुरे, पो. चोंढी,
ता. अलिबाग, जि. रायगड
पिन- ४०२ २०१

फोन नं.- २४५५३५

## ग्रुप ग्रामपंचायत नागांव

मु. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड, पिन - ४०२ २०४

जावक क्र. - ५७६ दिनांक- ०२/०७/२०२४

**जाहीर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत नागांव, ता. अलिबाग, जि.रायगड कडून १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे साहित्य पुरविठेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

| अ. क्र | निधीचा स्त्रोत | अंदाजित रक्कम | कामाचे नाव | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग | १,००,०००/- | ग्रा.प. हद्दीतील अंगणवाडी डिजिटल करणे | ६ महिने |
| २ | १५ वा वित्त आयोग | ७५,०००/- | मच्छर धूर फवारणी औषध खरेदी व फवारणी करणे. | ६ महिने |
| ३ | १५ वा वित्त आयोग | ५०,०००/- | जि.प शाळा डिजिटल करणे | ६ महिने |
| ४ | १५ वा वित्त आयोग/ ग्रामनिधी | दरपत्रकानुसार | TCL खरेदी करणे. (२५ किलो) | ६ महिने |
| ५ | १५ वा वित्त आयोग | दरपत्रकानुसार | मेडीक्लोर खरेदी करणे. (२००० आयोग नग) | २ महिने |
| ६. | १५ वा वित्त आयोग | ६,५२,४४२/- खरेदी करणे. | घंटागाडी ट्रक्टर ट्रॉली | २ महिने |

१) निविदे/दरपत्रके मोहोरबंद पाकीटात मा. सरपंच ग्रुप ग्रामपंचायत नागांव यांचे नावे दि.०५/०७/२०२४ ते ०९/०७/२०२४ रोजी पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १०.०० ते १.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.
२) कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा/दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
३) कोणत्याही नामंजूर निविदा/दर पत्रके संदर्भात संबंधित ठेकेदारास कुठल्याही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४) दिलेल्या मुदतीनंतर आलेली निविदा /दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
५) यासाठी आलेल्या निविदा/दरपत्रके पैकी कोणत्याही निविदा/ दरपत्रके किंवा सर्व निविदा/दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत आणि निविदा/दरपत्रके पाठविण्याच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा/दरपत्रके फेटाळण्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.
६)ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रके दि.१२/०७/२०२४ रोजी दुपारी ०३ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

सही/-
**सौ. श्वेता संजय कदम**
ग्रामविकास अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत नागांव
ता. अलिबाग, जि. रायगड

सही/-
**सौ. हर्षदा निखील मयेकर**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत नागांव

बँक ऑफ इंडिया
Bank of India BOI

## ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रांच

बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, पहिला मजला, २८, एस. व्ही. रोड, अंधेरी (प.), अंधेरी पश्चिम रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई– ४०० ०५८. दूर. क्र. २६२१०४०६/०७, ईमेल: asset.mnz@bankofindia.co.in

**स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी ई–लिलाव**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकांन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: खालील कर्जदार आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या मिळकती या बँक ऑफ इंडिया (तारण धनको) कडे गहाण/प्रभारित आहेत, ज्यांचा अन्वयीक/प्रत्यक्ष कब्जा बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या संबंधित कर्जदार आणि हमीदार यांच्याकडून बँक ऑफ इंडियाकडे असलेल्या गहाण/प्रभारित तारण मत्तांसापेक्ष येथे खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे संबंधित थकबाकीच्या वसुलीसाठी ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहेत. राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम प्रत्येक तारण मत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री येथे खालील पुरविलेल्या ई–लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.

**सरफैसी ॲक्ट,२००२ अन्वये ई–लिलाव विक्री सूचना नी कर्जदार/हमीदार यांना सूचना** **(रु.लाखांत) (ई–लिलावाची तारीख – २५.०७.२०२४)**

| अ. क्र. | खाते/कर्जदार/ हमीदारांचे नाव | मिळकतींचे वर्णन | राखीव किंमत/ इअर रक्कम | किमान बोली वाढ (लाखांत) | थकीत रक्कम (व्याज, दंड व्याज व खर्च वगळुन) (लाखांत) | सीईआरएसएआय सिक्युरिटी इंटरेस्ट/ ॲसेट आयडी | मिळकतीच्या ठिकाणी निरीक्षणाची तारीख/वेळ | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | **मे. लिओफोर्च्युन इन्फ्राबिल्डकॉन प्रा. लि. फॉर्च्युन कॅलिप्सो कर्जदार/हमीदार प्रदीप के. स्वामी प्रसाद के. स्वामी धिरेन सी. सावला वसंत डी. भामनिया सितापती चवली** | दुकान क्रमांक १, तळमजला, ए विंग, इमारत – "डॅफोडिल", फॉर्च्यून गार्डन सीएचएस लिमिटेड, पनवेल – माथेरान रोड, प्लॉट क्रमांक ४५२ ए, ४५४, ७९७, ८०० आणि ७९८, सर्व्हे नंबर ८, ९, १० आणि ११ , मौजे– कोप्रोली, पोस्ट– नेरे, तालुका– पनवेल, जि. रायगड – ४१०२०६. **चटई क्षेत्र –** १८४ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र –** २२१ चौ.फूट **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | १०.३५/ १.०३५ | १.०० | ५३७.१५ | २००००५५९०११० | १५.०७.२०२४ दु. १:०० ते दु. २:०० | ८३४०४७४२९७ |
| | | दुकान क्रमांक २, तळमजला, ए विंग, इमारत – "डॅफोडिल", फॉर्च्यून गार्डन सीएचएस लिमिटेड, पनवेल – माथेरान रोड, प्लॉट क्रमांक ४५२ ए, ४५४, ७९७, ८०० आणि ७९८, सर्व्हे नंबर ८, ९, १० आणि ११ , मौजे– कोप्रोली, पोस्ट– नेरे, तालुका– पनवेल, जि. रायगड – ४१०२०६. **चटई क्षेत्र –** १८४ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र –** २२१ चौ.फूट **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | १३.०५/ १.३०५ | १.०० | ५३७.१५ | २००००५६००२९३ | १५.०७.२०२४ दु. १:०० ते दु. २:०० | ८३४०४७४२९७ |
| | | दुकान क्रमांक ३, तळमजला, ए विंग, इमारत – "डॅफोडिल", फॉर्च्यून गार्डन सीएचएस लिमिटेड, पनवेल – माथेरान रोड, प्लॉट क्रमांक ४५२ ए, ४५४, ७९७, ८०० आणि ७९८, सर्व्हे नंबर ८, ९, १० आणि ११ , मौजे– कोप्रोली, पोस्ट– नेरे, तालुका– पनवेल, जि. रायगड – ४१०२०६. **चटई क्षेत्र –** १८४ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र –** २२१ चौ.फूट **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | १३.०५/ १.३०५ | १.०० | ५३७.१५ | २००००५६००३७३ | १५.०७.२०२४ दु. १:०० ते दु. २:०० | ८३४०४७४२९७ |
| | | दुकान क्रमांक ३, तळमजला, ए विंग, इमारत – "डॅफोडिल", फॉर्च्यून गार्डन सीएचएस लिमिटेड, पनवेल – माथेरान रोड, प्लॉट क्रमांक ४५२ ए, ४५४, ७९७, ८०० आणि ७९८, सर्व्हे नंबर ८, ९, १० आणि ११ , मौजे– कोप्रोली, पोस्ट– नेरे, तालुका– पनवेल, जि. रायगड – ४१०२०६. **चटई क्षेत्र –** १८४ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र –** २२१ चौ.फूट **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | १०.३५/ १.०३५ | १.०० | ५३७.१५ | २००००५६००४०७ | १५.०७.२०२४ दु. १:०० ते दु. २:०० | ८३४०४७४२९७ |
| | | फ्लॅट क्रमांक ३०२, तिसरा मजला, 'एच' विंग, 'ग्रीन हेवन रेसिडेन्सी' म्हणून ओळखली जाणारी इमारत, फॉर्च्युन गार्डन जवळ, नवीन सर्व्हे नंबर १, हिसा क्रमांक ५बी/१, २, ५बी/२, गाव– कोप्रोली, तालुका – पनवेल, जि. रायगड – ४१०२०६. **चटई क्षेत्र –** ४१८ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र –** ५०२ चौ.फूट **टेरेस क्षेत्र–** ६४५ चौ. फूट. **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | २७.००/ २.७ | १.०० | ५३७.१५ | २००००५५८८८०८ | १५.०७.२०२४ दु. १:०० ते दु. २:०० | ८३४०४७४२९७ |
| 2. | **मे. लिओफोर्च्युन इन्फ्राबिल्डकॉन प्रा. लि. फॉर्च्युन सिंफनी कर्जदार/हमीदार प्रदीप के. स्वामी प्रसाद के. स्वामी धिरेन सी. सावला वसंत डी. भामनिया सितापती चवली** | फ्लॅट क्रमांक ३०२, तिसरा मजला, 'ई' विंग, फॉर्च्यून गार्डन सीएचएसएल, मध्ये लिली म्हणून ओळखली जाणारी इमारत, पनवेल – माथेरान रोड, प्लॉट क्रमांक ४५२अ, ४५४, ७९७, ७९९, ८००, ७९६अ आणि ७९८ नवीन सर्व्हे नंबर १, हिसा क्रमांक ५बी /१, २ आणि ५बी/२, गाव – कोप्रोली, पोस्ट– नेरे, तालुका– पनवेल, जि. रायगड–४१०२०६. **चटई क्षेत्र –** ३७० चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र –** ४४४ चौ.फूट **टेरेस क्षेत्र–** ८४० चौ. फूट. **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | २८.३५/ २.८३५ | १.०० | ६७३.५२ | २००००६१११२०२४ | १५.०७.२०२४ दु. १:०० ते दु. २:०० | ८३४०४७४२९७ |
| | | फ्लॅट क्रमांक ३०२, तिसरा मजला, 'ई' विंग, फॉर्च्यून गार्डन सीएचएसएल, मध्ये मेरीगोल्ड म्हणून ओळखली जाणारी इमारत, पनवेल – माथेरान रोड, प्लॉट क्रमांक ४५२अ, ४५४, ७९७, ७९९, ८००, ७९६अ आणि ७९८ नवीन सर्व्हे नंबर १, हिसा क्रमांक ५बी/१, २ आणि ५बी /२, मौजे – कोप्रोली, पोस्ट– नेरे, तालुका– पनवेल, जि. रायगड–४१०२०६. **चटई क्षेत्र –** ३७० चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र –** ४४४ चौ.फूट **टेरेस क्षेत्र–** ९५० चौ. फूट. **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | २९.७०/ २.९७ | १.०० | ६७३.५२ | २००००६१११७६५ | १५.०७.२०२४ दु. १:०० ते दु. २:०० | ८३४०४७४२९७ |
| | | फ्लॅट क्रमांक ३०२, तिसरा मजला, 'एफ' विंग, 'ग्रीन हेवन रेसिडेन्सी' म्हणून ओळखली जाणारी इमारत, फॉर्च्युन गार्डन जवळ, नवीन सर्व्हे नंबर १, हिसा क्रमांक ५बी/१, २, ५बी/२, गाव– कोप्रोली, तालुका – पनवेल, जि. रायगड – ४१०२०६. **चटई क्षेत्र –** ४१८ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र –** ५०२ चौ.फूट **टेरेस क्षेत्र–** ६४५ चौ. फूट. **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | २६.१०/ २.६१ | १.०० | ६७३.५२ | २००००६१११५७४ | १५.०७.२०२४ दु. १:०० ते दु. २:०० | ८३४०४७४२९७ |

**ई–लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे :**

ई–लिलाव ''जे आहे जेथे आहे तत्वाने'', ''जे आहे जसे आहे तत्वाने'' आणि ''जे काही आहे तेथे आहे तत्वाने'' तत्वाने करण्यात येईल आणि तो ''ऑनलाईन'' करण्यात येईल.
लिलाव भारत सरकारचे मान्यता प्राप्त सेवा पुरवठादार श–इ इंटिग्रेटेड पोर्टल **(https://ibapi.in)** मार्फत करण्यात येईल. ई–लिलाव बोली प्रपत्र, घोषणा, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण अटी आणि शर्ती वेबसाईट **https://www.bankofindia.co.in** मध्ये उपलब्ध आहेत.
लिलाव १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारासह २५.०७.२०२४ रोजी स. ११.०० ते सायं. ५.०० भाप्रवे दरम्यान वेबसाईट **https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp** मार्फत ऑनलाईन ई–लिलाव/बोली ने करण्यात येईल.
बोलीदार **https://www.ibapi.in** ला भेट देऊ शकतात, जेथे बोलीदारांसाठी ''मार्गदर्शक तत्वे'' एज्युकेशनल व्हिडिओसह उपलब्ध आहेत. बोलीदारांनी पुरेशा आधी खालील औपचारिकता पूर्ण करायच्या आहेत:–
**टप्पा १:** बोलीदार/खरेदीदारांची नोंदणी : बोलीदारांनी त्यांचा मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी वापरुन ऑनलाईन पोर्टल **https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp.** वर नोंदणी करायची आहे.
**टप्पा २:** केवायसी पडताळणी : बोलीदारांनी आवश्यक केवायसी दस्तावेज अपलोड करायचे आहेत. केवायसी दस्तावेजांची ई–लिलाव सेवा पुरवठादारांकडुन पडताळणी करण्यात येईल (२ कामकाजाचे दिवस लागू शकतात).
**टप्पा ३:** त्यांच्या ग्लोबल इएमडी वॉलेटमध्ये इअर रकमेचे हस्तांतर : ई–लिलाव पोर्टलवरील जनरेट केलेली चलान वापरून एनईएफटी वापरुन फंडाचे ऑनलाईन/ऑफलाईन ट्रान्सफर करणे.
टप्पा १ ते टप्पा ३ ई–लिलावाच्या तारखेपूर्वी पुरशा आधी बोलीदारांनी पूर्ण करायचा आहे. बोलीदार नोंदणी आणि बोली मार्गदर्शनासाठी बोलीदार **https://www.ibapi.in** ला भेट देऊ शकतात.
**एमएसटीसीचा हेल्पलाईन तपशील/संपर्क व्यक्ती तपशील:**
**MSTC सेंट्रल हेल्पडेस्क क्रमांक: ०७९–६९०६६६००**
उपलब्धता– लिलाव प्रक्रिया, नोंदणी स्थिती, तांत्रिक सहाय्य इत्यादींबाबत मार्गदर्शनासाठी सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी ९:०० ते संध्याकाळी ५:०० पर्यंत.
इंडियन बँकेने हेल्पलाइन क्रमांक १८००१०२५०२६ आणि ०११–४१११०६१३१ IBAPI पोर्टल किंवा मालमत्ता सूचीशी संबंधित समस्यांसाठी जारी केले आहेत **(https://IBAPI.in)**

**ऑपरेशन्स**
**नोंदणी संबंधित प्रश्नांसाठी ईमेल करा**
**ibapi@mstcauction.com किंवा ibapi@mstcecommerce.com**
**श्री अरिंदम भट्टाचारजी, एसएम ०३३–२३४०००२७/३५०१३२२७**
**श्री सौरभ कुमार, डीएम ०३३–३५०१३२१९**
**श्री राकेश रंजन, डीएम ०३३–२३४००२९**

**फायनान्स**
**ईएमडी पेमेंट/परतावा संबंधित प्रश्नांसाठी ईमेल करा**
**ibapiin@mstcauction.com किंवा ibapi@mstcecommerce.com**
**श्री सुरजित मलिक, सीएम (एफ अँड ए) ०३३–२३४०००२८**
**श्री सुरजित हेमब्रम डीएम (एफ अँड ए) ०३३–३५०१३२१८**

१. इच्छुक बोलीदारांनी वैध इमेल पत्ता धारण केलेला पाहिजे. तपशिल आणि चौकशी करिता कृपया आयबीएपीआय हेल्पलाईन क्र. १८००१०२५०२६ किंवा ०११४११०६१३१, हेल्पलाईन ईमेल आयडी : **ibapi@allahabadbank.in** येथे संपर्क करावा.
२. प्राधिकृत अधिकाऱ्यांचे चांगले ज्ञान आणि माहितीनुसार मिळकत/तींवर बोजा नाही. तथापि इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीला बाधक दावे/हक्क/थकबाकी आणि लिलावासाठी ठेवलेल्या मिळकत/तींचे हक्क, बोजा संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करावी. ई–लिलावाची जाहिरात ही काही बँकेचे सादरीकरण किंवा वचन मानण्यात येऊ नये. मिळकत बँकेला ज्ञात किंवा अज्ञात विद्यमान आणि भविष्यातील बोजासह विकण्यात येईल. प्राधिकृत अधिकारी/तारण धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/हक्क/थकबाकीकरिता जबाबदार राहणार नाही. विक्रीसाठी ठेवलेल्या मिळकत/तींच्या संदर्भात ऑनलाईन बोली सादर केल्यानंतर कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत.
३. इसारा अनामत रक्कम (इअर) ऑनलाईन बोली सादर करण्यापूर्वी आयबीएपीआय पोर्टल मध्ये नमूद आणि मार्गदर्शनानुसार बँक खात्यामध्ये आरटीजीएस/ एनईएफटी/फंड ट्रान्सफरमार्फत जमा करणे आवश्यक आहे.
४. केवायसी दस्तावेज म्हणजे १.ओळखीचा पुरावा (केवायसी) म्हणजेच व्होटर आयडी कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट इ. २. पत्रव्यवहाराकरिता विद्यमान पत्त्याचा पुरावा, ३. बोलीदाराचे पॅनकार्ड ४. बोलीदारांचा वैध ई–मेल आयडी/संपर्क क्रमांक इ.
५. निरीक्षणाची तारीख वरील नमुद संपर्क क्रमांकावर पूर्व वेळ ठरवून नमुद केलेल्या वेळी वरील कोष्टकात नमुद नुसार राहील.
६. संभाव्य बोलीदार आयबीएपीआय पोर्टल यांचेकडून ई–लिलावावरील ऑनलाईन प्रशिक्षण घेऊ शकतात.
७. बोलीदारांनी योग्य तपशिलासह विहित प्रपत्रात फक्त ऑनलाईन प्रक्रियेद्वारे मिळकतीकरिता बोली सादर करणे आवश्यक आहे.
८. बोलीदारांनी विक्रीच्या अटी आणि शर्ती वाचल्याचे आणि समजून घेतल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्यावर बंधनकारक राहतील.
९. बोली मूल्य आरक्षित मूल्यापेक्षा जास्त असावे आणि बोलीदार त्यांचा पुढील प्रस्ताव रु. ५ करोड पर्यंत राखीव किमतीकरीता रु. १.०० लाख (रु. एक लाख) /रु. ५ करोड– रु. ९ करोड पर्यंत राखीव किंमतीकरीता रु. ५.०० लाख (रु. पाच लाख)/ आणि रु. ९ करोड पर्यंत राखीव किंमतीकरीता १०.०० लाख (रु. दहा लाख) च्या पटीत वाढवू शकतात.
१०. बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीबाबत त्यांचे समाधान आणि निरीक्षण करणे ही इच्छुक बोलीदाराची जबाबदारी राहील.
११. यशस्वी बोलीदाराची इसारा अनामत रक्कम (इअर) विक्री मोबदल्याचा भाग म्हणून राखून ठेवण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांची इअर ई–लिलाव विक्री प्रक्रिया संपल्यावर परत करण्यात येईल.
१२. इसारा अनामत रकमेवर कोणतेही व्याज देय नाही. यशस्वी बोलीदाराने त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त पुढील दिवशी प्राधिकृत अधिकाऱ्यांनी बोली किंमत स्वीकारल्यानंतर त्वरित अगोदर जमा केलेल्या (इअरसह) खरेदी रकमेच्या २५% आणि विक्री किंमतीची उर्वरित विक्रीपासून १५ दिवसात वा पूर्वी जमा करणे आवश्यक आहे. लिलाव बँकेच्या निश्चितीअधीन राहील. कुठल्याही टप्प्यावर यशस्वी बोलीदाराने रक्कम जमा करण्यात कसूर केल्यास अगोदर जमा केलेले सर्व पैसे जप्त करण्यात येतील आणि मिळकत पुन्हा विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि कसूरवार बोलीदाराचा मिळकत/रकमेच्या संदर्भात दावा/हक्क राहणार नाही.
१३. संभाव्य पात्र बोलीदार ई– लिलावाच्या तारखेपूर्वी आयबीएपीआय पोर्टल कडून ई–लिलावावरील ऑनलाईन प्रशिक्षण घेऊ शकतात. प्राधिकृत अधिकारी/ बँक किंवा मे. ई–प्रोक्युअरमेंट टेक्नॉलॉजिस लि. ऑक्शन टायगर हे इंटरनेट नेटवर्क प्रॉब्लेम/वीज जाणे किंवा कोणत्याही तांत्रिक अडचणी इ. करिता जबाबदार राहणार नाहीत. अशा आकस्मिक घटना टाळण्यासाठी बोलीदारांना ई–लिलाव प्रक्रियेत यशस्वीरित्या सहभागी होण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य उपकरणे, पॉवर बॅकअपची खात्री करण्याची विनंती करण्यात येत आहे.
१४. खरेदीदाराने प्रयोज्य मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क/इतर प्रभार इ. आणि सांविधिक/विना–सांविधिक थकबाकी, कर, निर्धारण प्रभार इ. कोणाचीही देणी भरायची आहेत.
१५. उच्चतम प्रस्ताव स्वीकारणे प्राधिकृत अधिकारी/बँकेवर बंधनकारक नाही आणि त्यांना कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी ई–लिलाव तहकूब/पुढे ढकलणे/रद्द करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मिळकत किंवा तिचा भाग काढून घेण्याचे सर्वस्वी हक्क आणि स्वेच्छा निर्णय राहतील.
१६. विक्री प्रमाणपत्र फक्त खरेदीदार/अर्जदाराच्या नावे जारी करण्यात येईल आणि कोणत्याही अन्य नावाने जारी करण्यात येणार नाही.
१७. विक्री सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत विहित नियम/अटीच्या अधीन राहील. विक्रीच्या अटी आणि शर्तीवर पुढील चौकशी तपशील काही असल्यास दिलेल्या संपर्क क्रमांकावरुन प्राप्त करता येईल.
१८. कोणीही सहभागी होणाऱ्यांनी स्वत:ची नोंदणी केल्यानंतर इअर जमा केली आहे आणि त्यानंतर त्यांची ई–बोली सादर केली नाही तर ते आयबीएपीआय पोर्टल मध्ये विनिर्दिष्ट पद्धती मार्फत बोली रक्कम राखून ठेवू शकतात.
१९. प्रयोज्य असेल तेथे जीएसटी यशस्वी बोलीदाराने भरायचा आहे.

**कर्जदार/हमीदारांसाठी विक्री सूचना**

निम्नस्वाक्षरीकार बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असल्याने, ही विक्री सूचना जारी करण्याचे व सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम ह्याच्या अन्वये विक्रीचे सर्व अधिकार वापरण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. वर वर्णन केलेल्या बँकेने मंजूर केलेल्या कर्जाच्या संबंधात व्याज आणि खर्च व आकार इ. सह थकीत रकमेचे प्रदान करण्यात तुम्ही कसूर केली आहे. म्हणून ६० दिवसांत उपरोक्त रक्कम अदा करण्यासाठी कलम १३(२) अन्वये बँकेने तुम्हा सर्वांना एक मागणी सूचना जारी केली. ६० दिवस संपूनही तुम्ही रकमेचे प्रदान केलेले नाही म्हणून, प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कलम १३(४) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वरील परिशिष्टात सविस्तर वर्णन केलेल्या तारण मत्तांचा कब्जा घेतला. तुम्हाला याद्वारे सूचना देण्यात येते की, विक्रीच्या निर्धारित तारखेपूर्वी वरील रक्कम तुम्ही प्रदान करावी, कसूर केल्यास, मिळकतीची विक्री केली जाईल आणि शिल्लक थकबाकी काही राहिल्यास व्याज व खर्चासह तुमच्याकडून वसूल केली जाईल. कृपया ध्यानात ठेवावे की, मागणी सूचना, कब्जा घेणे, मूल्यांकन आणि विक्री इ. शी संबंधित सर्व खर्च, पहिल्यांदा निम्नस्वाक्षरीकार रोकड करतील त्या विक्री रकमेतून वजा केले जातील आणि विक्री किंमतीपैकी उर्वरित रक्कम तुमच्या वरील दायित्वात वर्ग केली जाईल. इसारा रक्कम जमा करण्यासहित त्याच्या अटी आणि शर्तीवर होणाऱ्या लिलावात सहभागी होण्याची मोकळीक तुम्हाला आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०३.०७.२०२४**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी, बँक ऑफ इंडिया**

**निवडक**

### निरजची माघार नाही

**मुंबई :** ऑलिम्पिक सुवर्ण पदक विजेता, वर्ल्ड चॅम्पियन भालाफेकपटू नीरज चोप्राने पॅरिस डायमंड लीगमधून माघार घेतली. या माघारीनंतर नीरजने ही माघार दुखापतीमुळे घेतल्याची चर्चा सुरू झाली होती. मात्र, आता खुद्द नीरज चोप्रानेच याबाबत खुलासा केला आहे. त्याने सांगितले की या स्पर्धेतून मी माघार घेतलेली नाही. मी सध्या ऑलिम्पिक गेम्सची तयारी करत आहे. मला पाठिंबा दिल्याबद्दल आणि समजून घेतल्याबद्दल आभारी आहे.

### केदार जाधव विधानभवनात

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर टीम इंडियाचा माजी खेळाडू केदार जाधव अनेकदा भाजप नेत्यांसोबत दिसून आला आहे. महाराष्ट्राच्या विधानमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरु आहे. भारताने टी-२० विश्वचषक जिंकल्याच्या निमित्ताने विधानसभेत अभिनंदनाचा ठराव मांडला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर केदार जाधव हा मंत्री अतुल सावे यांच्यासोबत विधानभवनात दिसला. जाधव कोणत्या कारणासाठी आला होता हे कळले नाही.

### राहुल द्रविड भावुक

**बारबाडोस :** टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड ड्रेसिंग रूममध्ये म्हणाला की, आज मी माझ्या भावना शब्दांत व्यक्त करू शकत नाही. मला या अद्भुत प्रवासाचा एक भाग बनण्याची संधी दिल्याबद्दल मी तुम्हा सर्वांचे आभार मानतो. मला वाटतं तुम्हा सगळ्यांना हा क्षण नेहमी लक्षात राहील. तुमच्या कारकिर्दीत तुम्ही किती धावा केल्या, किती विकेट घेतल्या हे महत्वाचे नाही. पण असे क्षण तुम्हाला नेहमी आठवतील. त्याचा पुरेपूर आनंद घ्या.

### बारबाडोसचे वादळ

**बारबाडोस :** भारतीय टीम बार्बाडोसमध्ये काही काळ अडकली होती. त्यामुळे खेळाडूंना हॉटेलमध्येच थांबावं लागलं होतं. यावेळेस भारताचा फलंदाज विराट कोहली बार्बाडोसमधील वातावरण पत्नी अनुष्का शर्माला दाखवतानाचा व्हिडिओ समोर आला आहे. विराट कोहलीची पत्नी त्याच्यासोबत बार्बाडोसमध्ये आलेली नव्हती. त्यामुळे फायनल जिंकल्यानंतरही विराट त्याच्या कुटुंबीयांसोबत व्हिडिओ कॉलवर बोलताना दिसला होता.

### १९ कोटी लाईक्स

**मुंबई :** विराट कोहलीने क्रिकेटच्या मैदानावरच नाही, तर मैदानाबाहेरही अनेक विक्रम केले आहेत. टी वर्ल्ड कप २०२४ स्पर्धा भारतीय संघाने जिंकल्यानंतर त्याने केलेल्या पोस्टनेही मोठा विक्रम केला आहे. त्याने विजयाबद्दल केलेली पोस्ट ही इंस्टाग्रामवरील एखाद्या भारतीय अकाउंटवरील सर्वाधिक लाईक्स मिळालेली पोस्ट ठरली आहे. विराटच्या या पोस्टला १९ कोटींहून अधिक लाईक्स आले आहेत. तसेच लाखो कमेंट्स आल्या आहेत.

# हार्दिक पांड्या जगातील नंबर १ अष्टपैलू खेळाडू

## आयसीसीकडून मिळाला सन्मान



**। मुंबई । वृत्तसंस्था।**

**टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत हार्दिक पांड्याने आपल्या अष्टपैलू कामगिरीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. ट्रोलर्स देखील हार्दिक पांड्याचं कौतुक करताना दिसत आहे. कारण जेतेपदात त्याचा मोलाचा वाटा आहे. अंतिम सामन्यात त्याने टाकलेला चार षटकांचा स्पेल खूपच महत्त्वाचा होता. तर फलंदाजीतही हार्दिक पांड्याने कमाल दाखवली. त्याची ही अष्टपैलू कामगिरी पाहून आयसीसीकडून त्याला सन्मान मिळाला आहे.**

हार्दिक पांड्या हा जगातील नंबर १ अष्टपैलू खेळाडू ठरला आहे. आयसीसीच्या अष्टपैलू क्रमवारीत हार्दिक पांड्या टॉपला पोहोचला आहे. हार्दिक पांड्याने मोहम्मद नबी आणि वानिंदु हसारंगा यांना पाठी टाकत हा क्रमांक पटकावला आहे. पांड्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेपूर्वी तिसऱ्या क्रमांकावर होता. मात्र या स्पर्धेतील कामगिरीनंतर त्याने पहिलं स्थान पटकावलं आहे. हार्दिक पांड्याने आठ सामन्यात ४८ च्या सरासरीने १४४ धावा केल्या. यावेळी त्याचा स्ट्राईक रेट हा १५० हून अधिकचा होता. या खेळीत त्याने एक अर्धशतकही ठोकलं आहे. तसेच गोलंदाजीत ८ सामन्यात ११ गडी बाद केले आहे. इतकंच काय तर अंतिम सामन्यातील ३ षटकात २० धावा देत ३ गडी बाद केले. त्यात त्याने हेन्रिक क्लासेन आणि डेविड मिलर यांना बाद करत टीम इंडियाला विजयाच्या वाटेवर आणलं.

आयपीएल २०२४ स्पर्धेत पांड्याची कामगिरी एकदम निराशाजनक राहिली होती. मुंबई इंडियन्सच्या कर्णधारपदी विराजमान झाल्यानंतर संघाला साखळी फेरीतच गाशा गुंडाळावा लागला होता. त्यामुळे त्याची संघात निवड होईल की नाही इथून सुरुवात होती. इतकंच काय तर त्याला प्रत्येक सामन्यात ट्रोल केलं जात होतं. पण हार्दिक पांड्याने आपल्या कामगिरीने या सर्वांची तोंडं बंद केली आहेत. आता टी-२० वर्ल्डकपनंतर हार्दिक पांड्याकडे टी-२० संघाची धुरा सोपवली जाऊ शकते. कारण हार्दिक पांड्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत उपकर्णधार होता.

तसेच अनेकदा त्याने कर्णधारपदाची भूमिका बजावली आहे. टी-२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर हार्दिक पांड्याचा आत्मविश्वास दुणावला आहे. वर्ल्ड चॅम्पियन बनण्याची ही फक्त सुरुवात असल्याचं त्याने सांगितलं होतं. तसेच अजून पाच ट्रॉफी जिंकायच्या आहेत, असं सांगितलं होतं. हार्दिक पांड्या जर कर्णधार झाला तर त्याच्या नेतृत्वात २०२६ चा वर्ल्डकप खेळला जाईल.

# वोंड्रोउसोवा पहिल्याच फेरीत गारद

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेची गतविजेती चेक प्रजासत्ताकच्या मार्केटा वोंड्रोउसोवाला महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत गाशा गुंडाळावा लागला. तर, अमेरिकेची जेसिका पेगुला व कोको गॉफ तसेच जपानची नाओमी ओसाका यांनी पुढच्या फेरीत आपले स्थान निश्चित केले. पुरुष एकेरीत इटलीच्या अग्रमानांकित यानिक सिन्नेर, नोव्हाक जोकोविच व ॲलेक्झांडर इव्हेरेवने दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले.

महिला एकेरीच्या सामन्यात सहावी मानांकित वोंड्रोउसोवा सहज विजय मिळवले असे दिसत होते. मात्र, स्पेनच्या युवा जेसिका मानेइरोने वोंड्रोउसोवाला स्थिरावू न देता ६-४, ६-२ असा विजय मिळवत धक्कादायक निकालाची नोंद केली. सामन्याच्या सुरुवातीपासूनच जेसिकाने वोंड्रोउसोवाला दबावाखाली ठेवले व तिला पुनरागमन करण्याची संधी दिली नाही. ३० वर्षांपूर्वी गतविजेत्या स्टेफी ग्राफलाही अशाच पद्धतीने पहिल्या फेरीत पराभूत व्हावे लागले होते. अन्य सामन्यांत, पाचव्या मानांकित पेगुलाने अमेरिकेच्या ॲश्लेन क्रुएगरला ६-२, ६-० असे पराभूत केले. गॉफनेही कॅरोलिन डोलेहाइवर ६-१, ६-२ असा सरळ सेटमध्ये विजय नोंदवला. तर, ओसाकाने संघर्षपूर्ण लढतीत फ्रान्सच्या डिआने पेरीला ६-१, १-६, ६-४ असे नमवले. चौथ्या मानांकित कझाकस्तानच्या एलिना रायबाकिनाने रोमानियाच्या एलिना गॅब्रिएला रुसवर ६-३, ६-१ असा सरळ सेटमध्ये विजय नोंदवत पुढच्या फेरीत धडक मारली. पुरुष एकेरीत सिन्नेरने जर्मनीच्या यानिक हाफमनला ६-३, ६-४, ३-६, ६-३ अशा फरकाने विजय नोंदवला. पहिले दोन सेट जिंकल्यानंतर तिसऱ्या सेटमध्ये हाफमनने खेळ उंचावत पुनरागमन केले. चौथ्या सेटमध्ये सिन्नेरने चमक दाखवत विजय सुनिश्चित केला. तर, पुरुष एकेरीत जेतेपदाच्या प्रबळ दावेदारांपैकी एक असलेल्या सर्बियाच्या दुसऱ्या मानांकित नोव्हाक जोकोविचने चेक प्रजासत्ताकच्या विट कोपरिवाला ६-१, ६-२, ६-२ अशा सरळ सेटमध्ये नमवले. तर, चौथ्या मानांकित जर्मनीच्या ॲलेक्झांडर इव्हेरेवने स्पेनच्या रॉबर्टो कारबालेस बाएनावर ६-२, ६-४, ६-२ असा विजय मिळवला. सातव्या मानांकित पोलंडच्या हबर्ट हुरकाझने मोल्डोवाच्या राडू एल्बोटला ५-७, ६-४, ६-३, ६-४ असे नमवत पुढची फेरी गाठली. भारताच्या सुमित नागलचे विम्बल्डन स्पर्धेतील आव्हान पहिल्या फेरीतच संपुष्टात आले.



# ‘‘पासपोर्ट आणि मोबाईल विसरलो’’

**। मुंबई । वृत्तसंस्था।**

टी-२० वर्ल्डकपनंतर लगेचच भारत वि झिम्बाब्वेमध्ये पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघात नवीन चेहऱ्यांना संधी मिळाली. भारतीय संघ शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली झिम्बाब्वेमध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळणार आहे. कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यासारख्या वरिष्ठ खेळाडूंनी टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर या फॉरमॅटमधून निवृत्तीची घोषणा केली.



भारताच्या तीन दिग्गज खेळाडूंनंतर एक तरुण भारतीय संघ झिम्बाब्वे दौऱ्यावर गेला आहे. रियान पराग, अभिषेक शर्मा यांची प्रथमच भारतीय संघात निवड झाली आहे. टीम इंडियाकडून खेळण्याची संधी मिळाल्यानंतर रियान पराग इतका उत्साही होता की, तो आपला पासपोर्ट आणि मोबाईल फोन विसरला. बीसीसीआयने याबाबत एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये अभिषेक शर्मा आणि रियान पराग यांनी टीम इंडियासोबत प्रवास करतानाचा अनुभव शेअर केला आहे.

रियान पराग म्हणाला, ‘‘भारतीय संघासोबत अशाप्रकारे प्रवास करणं हे लहानपणापासून माझं स्वप्न होतं. क्रिकेट तर आम्ही सगळेच खेळतो, पण भारतीय संघासोबत प्रवास करणे, भारताची जर्सी घालणं, या गोष्टीही येतात. मी इतका उत्साहित होतो की मी माझा पासपोर्ट आणि मोबाईल फोन विसरलो, विसरलो म्हणजे मी कुठेतरी भलतीकडेच ठेवले.

पण आता पासपोर्ट मोबाईल दोन्ही मिळाले.’’आसाममधील एक लहान मुलाने लहानपणापासून भारतासाठी क्रिकेट खेळण्याचे स्वप्न पाहिले, जेव्हा ते सत्यात उतरले तेव्हा मला खूप आनंद झाला. झिम्बाब्वेसोबत चांगला खेळण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे, असही तो म्हणाला.

## फ्रान्संचा संघ उपांत्यपूर्व फेरीत

**जर्मनी :** यूरो कपच्या उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सनं अटीतटीच्या लढतीत बेल्जियमवर १-० असा विजय मिळवत प्रवेश केला आहे. फ्रान्सपूर्वी उपांत्यपूर्व फेरीत स्पेन, जर्मनी, इंग्लंड, स्वित्झर्लंड, पोर्तुगाल या संघांनी प्रवेश केला आहे. उपांत्यपूर्व फेरीत आता फ्रान्स आणि पोर्तुगाल यांच्यात लढत होईल. याशिवाय स्पेन विरुद्ध जर्मनी, इंग्लंड विरुद्ध स्वित्झरलँड यांच्यासह आणखी दोन संघांमध्ये लढती होतील.

फ्रान्सनं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेशाला कारण ठरला तो बेल्जियचा डिफेंडर जॅन व्हर्टोंघेन यानं केलेला आत्मघातकी गोल होय. व्हर्टोंघेनच्या गोलनं संघाला यूरो कपमधून बाहेर पडावं लागलं आहे.

# भारतीय संघासह पत्रकार मायदेशी परतणार

## ■ बीसीसीआयसह जय शाह करणार मदत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली, भारतीय क्रिकेट संघाने २९ जून रोजी बार्बाडोसमधील केन्सिंग्टन ओव्हल मैदानावर टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावले. दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या अंतिम सामन्यात ७ धावांनी रोमहर्षक विजय मिळवत ११ वर्षांपासून सुरू असलेला आयसीसी ट्रॉफीचा दुष्काळ संपवला. तेव्हापासून सर्व भारतीय चाहते संघाच्या देशात परतण्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. पण बार्बाडोसमधील चक्रिवादळामुळे संघ दोन दिवस तिथेच अडकला होता. पण आता भारतीय संघ बीसीसीआय आणि जय शहा यांच्या प्रयत्नाने मायदेशात परतणार आहेत.



अंतिम सामन्यानंतर बार्बाडोसमध्ये चक्रीवादळामुळे विमानतळावरून उड्डाणे बंद केल्यामुळे टीम इंडियाला तिथेच थांबाव लागलं.

मिळालेल्या माहिती नुसार ते लवकरच भारतात रवाना होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. बार्बाडोसमध्ये आलेल्या चक्रीवादळानंतर तेथील पंतप्रधानांनी २ जुलै रोजी दिलेल्या निवेदनात पुढील ६ ते १२ तासांत विमानतळाचे काम सुरू केले जाऊ शकते, अशी माहिती दिली होती.

अनेक रिपोर्ट्सनुसार, टीम इंडिया ३ जुलै रोजी स्थानिक वेळेनुसार पहाटे १ वाजता बार्बाडोसवरून रवाना होईल, त्यानंतर संघ गुरुवार, ४ जुलै रोजी भारतात पोहोचेल. अंतिम सामना पाहण्यासाठी बार्बाडोसमध्ये पोहोचलेले बीसीसीआयचे सचिव जय शाह देखील टीम इंडियासोबत परतणार आहेत, ज्यात खेळाडूंव्यतिरिक्त सपोर्ट स्टाफचाही समावेश आहे.

वर्ल्डकप कव्हर करण्यासाठी भारतीय मीडियादेखील कॅरेबियनमध्ये पोहोचला होता. आता त्यांना भारतीय संघ आणि सपोर्टस्टफसह भारतात आणण्याची व्यवस्था बीसीसीआय आणि जय शाह यांनी केली आहे. २० पत्रकारांची तुकडी असलेला संघ स्पेशल विमानाने परतणार आहे.

# रोमानियाविरुद्ध नेदरलँडचा ३-० ने विजय

**। जर्मनी । वृत्तसंस्था ।**

डोनीएल मालेने केलेल्या दोन गोलच्या सहाय्याने २००८ नंतरच्या पहिल्या युरो उपांत्यपूर्व फेरीत नेदरलँडने स्थान निश्चित केले. नेदरलँडने शेवटच्या-१६ सामन्यात रोमानियाचा ३-० असा पराभव केला. या विजयासह यूरो कप २०२४ च्या उपांत्य फेरीत नेदरलँडने प्रवेश केला आहे. नेदरलँडचा संघ अंतिम आठमध्ये तुर्की किंवा ऑस्ट्रियाशी खेळेल.

नेदरलँडच्या कोडी गॅकपोने पहिल्या हाफमध्ये आघाडी मिळवून दिली होती.



### फ्रान्सचीही उपांत्य फेरीत धडक

**यूरो कपच्या उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सनं अटीतटीच्या लढतीत बेल्जियमवर १-० असा विजय मिळवत प्रवेश केला आहे. उपांत्यपूर्व फेरीत आता फ्रान्स आणि पोर्तुगाल यांच्यात लढत होईल.**

# करीअरच्या शेवटच्या टप्प्यात कहर

## ■ अंडरसनने घेतल्या ७ विकेट्स

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

नुकतंच कसोटी क्रिकेटला रामराम ठोकण्याची घोषणा जेम्स अँडरसनने केली आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध लॉर्ड्सवर शेवटची कसोटी खेळणार आहे. तत्पूर्वी अँडरसनने काउंटी क्रिकेटमध्ये आपल्या गोलंदाजीची धार दाखवली. नॉटिंघमशरच्याविरुद्ध फक्त ३५ धावा देत ७ गडी बाद केले.

साउथ पोर्टमध्ये खेळत असलेल्या सामन्यात लँकशरने प्रथम फलंदाजी करताना ३५३ धावा केल्या. तर या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या नॉटिंघशरच्या फलंदाजांना जेम्स अँडरसनने मैदानात टिकूच दिलं नाही. स्विंग आणि अचूक टप्प्याची गोलंदाजी करत फलंदाजांना सळो की पळो करून सोडलं.



अँडरसनने पहिल्यांदा कर्णधार हसीब हमीदला बोल्ड केलं. त्यानंतर यंग विल, जो क्लार्क, जॅक हेन्स, लिंडन जेम्स यांना तंबूचा रस्ता दाखवला. अँडरसनने सुरुवातीच्या सात पैकी ६ फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला.

**नॉटिंगहॅमशायर (प्लेइंग इलेव्हन):** हसीब हमीद (कर्णधार), बेन स्लेटर, विल यंग, जो क्लार्क (विकेटकीपर), जॅक हेन्स, लिंडन जेम्स, लियाम पॅटरसन-व्हाइट, केल्विन हॅरिसन, ऑली स्टोन, डिलन पेनिंग्टन, डेन पॅटरसन.

**लँकेशायर (प्लेइंग इलेव्हन):** कीटन जेनिंग्स (कर्णधार), ल्यूक वेल्स, जोश बोहानन, जॉर्ज बेल, मॅथ्यू हर्स्ट (विकेटकीपर), जॉर्ज बाल्डरसन, ख्रिस ग्रीन, टॉम बेली, विल विल्यम्स, नॅथन लियॉन, जेम्स अँडरसन.

## खेळाडूंनसह क्रिकेटप्रेमींना लागली उत्सुकता....

# आयपीएल २०२५ चा मेगा लिलाव कधी, कुठे होणार?

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**२०२२ चा लिलाव फेब्रुवारी महिन्यात आयोजित करण्यात आला होता, परंतु गेल्या दोन हंगामाचा लिलाव डिसेंबरमध्ये आयोजित केला होता. इंडियन प्रीमियर लीगचे अध्यक्ष अरुण सिंग धुमल यांनी दिलेल्या माहितीनूसार आयपीएल २०२५ पूर्वी एक मेगा लिलाव आयोजित केला जाणार आहे. मात्र त्याची तारीख अद्याप समोर आलेली नाही.**

२०२२ च्या लिलावाप्रमाणे, मेगा लिलाव देखील २ दिवसांसाठी आयोजित केला जाऊ शकतो. २०२२ चा लिलाव फेब्रुवारीमध्ये झाला होता, तर पुढील २ वर्षांसाठी ही प्रक्रिया डिसेंबर महिन्यात झाली होती. अशा परिस्थितीत, मेगा लिलावाची तारीख डिसेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान ठेवली जाऊ शकते.



**लिलाव कुठे होणार?**

२०२२ मध्ये झालेला शेवटचा मेगा लिलाव बंगळुरूमधील एका खाजगी हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला होता. पण २०२३ आणि २०२४ चे लिलाव अनुक्रमे केरळ आणि यूएईमध्ये झाले. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ लवकरच लिलावासाठी ठिकाणाचे नाव जाहीर करू शकते, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**२०२५ मेगा लिलावात नवीन नियम?**

२०२२ मध्ये झालेल्या मेगा लिलावावर नजर टाकल्यास एकूण २०४ खेळाडूंवर बोली लावण्यात आली होती. या २०४ खेळाडूंची एकूण किंमत ५५१ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात आले. आयपीएल तसेच क्रिकेटच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे २०२५ च्या मेगा लिलावात खेळाडूंची संख्या आणखी वाढू शकते. प्रत्येक संघाला ३ ते ४ खेळाडू ठेवण्याची परवानगी असेल.

फ्रँचायझी जास्तीत जास्त २५ खेळाडू खरेदी करू शकते, त्यापैकी ८ परदेशी खेळाडू आहेत, परंतु एक संघ या ८ परदेशी खेळाडूंपैकी केवळ ४ खेळाडूंना प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देतो. अमेरिकेसह इतर अनेक देशांचे खेळाडू देखील लिलावात आपला दावा करू शकतात.

# टीम इंडियाची ओपन डेकमधून मिरवणूक

## ■ मुंबईत स्वागताची तयारी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

२९ जून २०२४ रोजी दक्षिण आफ्रिकेचा पराभव करुन टी-२० विश्वचषकावर आपले नाव कोरले. २०१३ नंतर टीम इंडियाने आयसीसी ट्रॉफी जिंकली. या ऐतिहासिक विजयानंतर संपूर्ण देश आपल्या टीमचे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे. मात्र टीम इंडिया अजूनही बार्बाडोसमध्ये अडकून पडली आहे. ४ जुलै रोजी भारतात येणार आहे.

२९ जून रोजी अंतिम सामना खेळला गेला, त्यानंतर तेथे आलेल्या चक्रीवादळाने टीम इंडियाला बार्बाडोसमध्येच राहावे लागले. वादळामुळे बार्बाडोसचे विमानतळ बंद करण्यात आले असून तेथे कर्फ्यूसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. टीम इंडिया गेल्या मंगळवारी तिथून रवाना होणार होती, पण त्याला देखील उशीर झाला. त्यामुळे उद्या सकाळी ६ वाजता टीम इंडिया दिल्लीत दाखल होणार आहे. यासाठी एक एअर इंडियाचं विशेष विमान बार्बाडोस विमानतळावर दाखल झाले आहे.

**मुंबईत विजयी मिरवणूक?**

टीम इंडिया मायदेशात दाखल झाल्यानंतर नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. यावेळी नरेंद्र मोदींच्या हस्ते सर्व खेळाडूंना गौरवण्यात येईल, अशी माहिती समोर येत आहे. तसेच नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर टीम इंडिया मुंबईत दाखल होईल. यानंतर मुंबईत विश्वचषकाच्या ट्रॉफीसह सर्व खेळाडूंची ओपनडेकबसमधून विजयी मिरवणूक काढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. याबाबत बीसीसीआयकडून अधिकृत माहिती मात्र समोर आलेली नाही.

**२००७ साली काढली होती मिरवणूक-**

नवख्या महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली नव्या दमाच्या टीम इंडियाने पाकिस्तानला लोळवून २००७ मध्ये पहिला टी-२० वर्ल्ड कप जिंकल्यानंतर जगज्जेत्या टीम इंडियाच्या खेळाडूंची मुंबईमध्ये ओपन बसमधून जंगी मिरवणूक निघाली होती. तब्बल आठ तास चाललेल्या विश्वविजयी मिरवणूक संघाचे स्वागत करण्यासाठी लाखो मुंबईकर रस्त्यावर उतरले होते. जगज्जेत्यांच्या स्वागताची जोरदार तयारी केली जात असून बीसीसीआयने याबाबत प्रचंड गोपनीयता बाळगली असावी, अशीही शक्यता क्रिकेट जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.

**बीसीसीआयकडून टीम इंडियाला १२५ कोटी रुपयांचं बक्षीस-**

बीसीसीआयने भारतीय संघासाठी १२५ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम जाहीर केली आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)